संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 10 | Marathi Monthly | Thane, 1 April 2026 to 30 April 2026 | Pages 16 | Price : 10/-

# कामगार सन्मानाने जगला तरच, कारखाना जगेल...अन्यथा नव्हे!

## रोह्यातील विजयी सभेत, राजन राजे यांचा 'भांडवली-व्यवस्थे'वर घणाघाती प्रहार....



**रोहा/धाटाव (रायगड) : ''मराठी माणसाचं नाव घेऊन पक्ष काढायचे, राजकारण करायचं आणि त्याच मराठी कामगाराची फसवणूक करायची, त्याचे संप फोडायचे! मराठी-माणसांच्या हातात दगड द्यायचे, कामगारांना एकमेकांची डोकी फोडायला लावायची...आणि, तेच 'दगड' गोळा करत, त्या मराठी-नेत्यांनी आपले 'गड' बांधायचे... हा उफराटा उत्पात, महाराष्ट्राच्या कामगारविश्वात अजून कितीकाळ चालणार आहे? मराठी माणसांनो, म्हणजे अर्थातच मराठी-कामगारांनो, लक्षात घ्या की, ''फेकला तर दगड, रचला तर गड'' याच मराठी-मराठी करणाऱ्या नेत्यांनी, ''कारखाना जगला तरच, कामगार जगेल'' अशी मालकवर्गाची 'दलाली' करणारी आणि आपल्याच श्रमिक मराठी-जमातीला मुळातूनच भेदरवून टाकणारी घोषणा दिली... कुठल्याही जातिवंत नेत्याने आपल्या समाजाला, विजिगिषू प्रेरणा व चेतना द्यायची असते; अकारण घाबरवून सोडायचं नसतं.** या देशातला एक 'बाबासाहेब', शेकडो-हजारो वर्षे गुलामीत खितपत पडलेल्या पददलित 'मृण्मय' मनांना 'चिन्मय' करण्यासाठी आपलं आयुष्य पणाला लावतो; तर, आमचे मराठी राजकारणी 'दुकानदारसाहेब', आपल्याचं जमातीचं खच्चीकरण करु पहातात? 'भाषा आणि भाषण' यावरील अंगभूत प्रभुत्वाचा गैरवापर करत, मराठी-कामगाराला 'भांडवली-गुलामी'कडे कौशल्याने ढकलत नेणाऱ्या घृणास्पद राजकीय-डावपेचांना छेद देण्यासाठीच, ''कामगार सन्मानाने जगला; तरच, कारखाना जगेल...अन्यथा नव्हे'', ही गेली चार दशकं आम्ही भीमगर्जना करत आलोत! **'धर्मराज्य'सारखं 'सहकार्य आणि संघर्ष' इतर कोणी करु शकत नाही...तेव्हा, यातलं नेमकं काय निवडायचं; ते संबंधित व्यवस्थापनांनी व भांडवलदारांनी ठरवावं!''** असं रोखठोक प्रतिपादन 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार नेते राजन राजे यांनी, रोह्यात केले.

धाटाव एमआयडीसीमधील, 'डीआरटी अँथिया अरोमा केमिकल्स प्रा. लि.' या कंपनीतील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या कामगार सभासदांना नुकतीच ऐतिहासिक स्वरुपाची रु. १४ हजारांची 'थेट' ('C.T.C.'सारखी तद्दन फसवी पगारवाढ नव्हे) पगारवाढ त्रैवार्षिक ...पृष्ठ क्र. २ वर

(दि. ९ मार्चच्या DRT Anthea, रोहा-घाटाव MIDC कंपनीत, थेट १४ हजार पगारवाढीचा ऐतिहासिक करार संपन्न झाल्यानिमित्ताने, पार पडलेल्या आनंदी-सोहळ्याच्या पार्श्वभुमीवर....)



DRT Anthea (रोहा) मधील मित्रांनो,

आम्ही रात्रीच्या भोजनानंतर तुम्हा सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन निघालो; ते पहाटे दोन-अडीचपर्यंत आपापल्या घरी पोहोचलो...पण, एवढा लांबचा प्रवास व जागरण होऊनदेखील कुणालाही थकल्यासारखं वाटलं नाही, ...पृष्ठ क्र. २ वर

अंतरंग



असा समाज साथीच्या आजाराने मरणाच्याच लायकीचा असतो!!

पृष्ठ क्र. ६



लोकशाही भारत-राष्ट्र की, सनातनी हिंदु राष्ट्र? पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने... ...राजन राजे

पृष्ठ क्र. ८



इस्रायल, अमेरिका, इराण... जो जे वांछील तो ते लाहो!

....निळू दामले

पृष्ठ क्र. ११

फुकटखाऊ राजकारणाचा अंत झालाच पाहिजे, नाही तर...?

प्रकाश पोहरे

पृष्ठ क्र. १३

## कामगार सन्मानाने जगला तरच, कारखाना जगेल... ...पृष्ठ क्र. १ वरुन

कराराद्वारे करण्यात आली, त्याप्रसंगी, झालेल्या विजयी-सभेत राजन राजे बोलत होते.

यावेळी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव नरेंद्र पंडित, पक्षाचे खजिनदार अजित सावंत, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी, श्रमिक संघाचे नेते शिशिर ढवळे, आंबेडकरी विचारवंत आनंदा होवाळ, सामाजिक कार्यकर्ते ॲड. नाना अहिरे, कामगार प्रतिनिधी निरंजन म्हात्रे, दिलीप राणे, विनोद गायकवाड आदी मान्यवरांसह, 'डीआरटी अँथिया' कंपनीतील कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

दरम्यान, आपल्या तासाभराच्या तडाखेबंद भाषणात कामगारांना संबोधित करताना राजन राजे यांनी सुरुवातीलाच, १४ हजारांची भरघोस पगारवाढ झाल्याबद्दल उपस्थित कामगारांचे अभिनंदन केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले, ''माझ्या प्रत्येक कामगाराचे आर्थिक-उन्नयन व्हावे; यासाठी, मी गेली चार दशकं 'भांडवली-व्यवस्थे'शी संघर्ष करत आलोय. कामगारांनी 'श्रीमंत' जरुर व्हायला हवं; पण, त्याआधी 'नितीमंत' होणे गरजेचे आहे... ''आधी नितीमंत, मगच श्रीमंत! 'फोडा आणि झोडा', या कपटी-दुष्ट भांडवली-नितीने, कृत्रिमरित्या निर्माण केलेले... 'कंत्राटी / कायम / मुदतबंद कामगार' वगैरे कामगारभेदांना 'फाट्यावर मारुन', प्रत्येक कामगाराच्या जगण्यात श्रीकृष्णाचं आनंदी 'गोकुळ' निर्माण व्हावं, ही माझी जीवन-प्रेरणा आहे... तुमच्या डोळ्यांच्या पापण्यांवर बांधलेलं समाधानाचे-सुरक्षिततेचं 'पैंजण'; हेच, माझ्या जगण्याचं 'इंधन' आहे...ते कुठलं वनस्पती तेल अथवा आखाती खनिज तेलस्वरुप



इंधन नव्हे! संकटं सर्वांवर येतात, ती सज्जनांवर येतात; तशी दुर्जनांवरही येतात...पण, शंभर संकटं कोसळूनही सज्जन ठाम उभा राहू शकतो: पण, एखाद्या संकटानेही, आतून पोकळ डोलारा असलेला दुर्जन कोसळू शकतो; हे लक्षात ठेवा. 'आळशी-उद्धट कामगार राष्ट्राला भार...नितीमान कामगार राष्ट्राला आधार', ही आपली 'धर्मराज्य-घोषणा' कधिही विसरु नका; आपल्या चुकीच्या वागणुकीमुळे कधी संकट ओढवून घेऊ नका...संकटं यायचीच असतील, तर त्यांना त्यांच्याच पावलांनी येऊ द्यात...तुमची पाऊले वा तुमच्या पादुका, त्यांना बहाल करु नका'', असा वडीलकीचा सल्लादेखील राजन राजे यांनी यावेळी कामगारांना दिला.

राजन राजे भाषणाचा ओघ पुढे न थांबता सुरुच होता.... ''डॉ दत्ता सामंतांसारखे लढवय्ये कामगार-नेते आणि 'FERA'सारखे कायदे होते; तोपर्यंतच, बहुराष्ट्रीय कंपन्यांमधून कामगारांना उत्तम वेतन-सुविधा मिळत होत्या; पण, आता बहुराष्ट्रीय कंपन्याच कामगारांचं शोषण करण्यात व कॉर्पोरेटीय क्षेत्रात 'कंपनी-दहशतवाद' (Corporate Terrorism) माजवण्यात आघाडीवर आहेत. निष्ठावंत कामगार हा, कामगार चळवळीच्या 'पायाचा दगड' असतो, दहीहंडीच्या सगळ्यात खालच्या थरासारखा संघटनेचा तो मजबूत आधार असतो; जोडीला शिस्त व एकजुटीचं कसोशीनं पालन करा. वाढीव पगाराचा पैसा अत्यंत खुबीने कुटुंबाच्या हितासाठीच वापरा, नवीन चकचकित चारचाकी गाडी घेतल्या दिवसापासूनच म्हातारी व्हायला सुरुवात होते; म्हणून त्यावर पैसे उडवण्यापेक्षा आपली 'काळी आई' असणाऱ्या जमिनीत पैसे गुंतवा, योग्य ठिकाणी विचारपूर्वक गुंतवणूक करा...पुढील काळाचा भरवसा नाही; म्हणून, भविष्यातील संकटे वा संघर्षासाठी पगारातले ठराविक पैसे राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदतठेवीत राखून ठेवा, चंगळवादाच्या नादी लागू नका...येणाऱ्या कठीण काळाची पाऊले वेळीच ओळखा, यश मिळवणे सोपं असतं; पण, ते टिकवणे आणि वाढवणे कठीण असते. केवळ, तुमचंच नव्हे; तर, रोह्यातील प्रत्येक कामगाराचं चांगभलं व्हायलाच पाहिजे, या दिशेने प्रयत्नरत रहा...फक्त पगार/बोनस वाढीसाठी नव्हे; तर, कामगारांच्या सन्मानासाठी 'राजन राजे' हा 'पंचाक्षरी-मंत्र' आहे, हे विसरु नका!'' अशा शब्दांत धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी कामगारांमध्ये स्फुल्लिंग चेतवले.

...या आनंदोत्सवासमयी, 'डीआरटी अँथिया'च्या कामगारांनी, संपूर्ण रोहा शहर आणि धाटाव एमआयडीसीतून बाईक रॅली काढत, राजन राजे यांचे अभूतपूर्व स्वागत केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युनिट अध्यक्ष प्रमोद जंगम, उपाध्यक्ष निखिल वरणकर, सेक्रेटरी मयुर कोंडे, कार्यकारिणी सदस्य विनोद मगर आणि रामदास साखीळकर आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## थेट १४ हजार पगारवाढीचा ऐतिहासिक करार ...पृष्ठ क्र. १ वरुन

हे विशेषच! कालचा दिवस दीर्घकाळ आम्हा सर्वांच्या स्मरणात राहील...तो केवळ, तुम्ही दोनचार किमी लांब गाडीच्या उघड्या टपातून काढलेल्या भव्य मिरवणुकीसाठी अथवा रोह्यातील नाक्यानाक्यावर लावलेल्या 'धर्मराज्य'च्या भव्य बॅनर्समुळे किंवा फटक्यांच्या आतषबाजीनेच नव्हे; तर, ज्यापद्धतीने तुम्ही एकजीव होऊन रोह्यातील कामगार-कर्मचारीवर्गाच्या चाललेल्या ससेहोलपट व चाललेल्या त्यांच्या पिळवणुकविरुद्ध आवाज बुलंद केलायत, त्यामुळेच...त्या सर्व क्रांतिसदृश घटनाक्रमाला 'धर्मराज्य-सलाम'!

आमच्या सोबत आलेले कॉ. नाना अहिरे, आनंदा होवाळ आणि शिशिर ढवळे ही, आपलं अवघं आयुष्य सामान्यांच्या चळवळीसाठी वेचलेली मान्यवर मंडळी, तो नयनरम्य सोहळा पाहून खूपच सुखावली, खरंतर अगदी अचंबित झाली. त्यांनी आवर्जून मला, त्यांच्या भावना तुम्हाला कळवायला सांगितल्यात, त्या अशा की, ''आम्ही कामगार-चळवळ संपल्याचं गृहीत धरुन चाललो होतो; पण, कालच्या एकूणच उत्साही व कामगार-ऊर्जेनं भारीत वातावरण पाहून, अजूनही खूप काही आशा करायला जागा असल्याची आमची मनोमन खात्री पटलीय...या DRT Antheaच्या नवतरुण युवकांना आपण सतत योग्य मार्गदर्शन केलं; तर, निराशाजनक काळाचा 'काळा' पट फाडून नवीन लख्ख प्रकाशमान ऊर्जास्त्रोत, तेथील सर्वच कामगारांच्या जीवनात आपल्याला निर्माण करता येईल!''

...या मान्यवर मंडळींना दोन गोष्टींचं मोठं अप्रूप वाटलं...त्यातली एक म्हणजे, 'कामगारांच्या धर्मपत्नी' स्वयंस्फूर्तीने विजयी-सोहळ्यात सहभागी झाल्या व दुसरं म्हणजे 'गोरखनाथ' हा माजी कमिटी-सभासद व ज्येष्ठ कंपनी-कामगार, आपल्या आजारी मुलीला इस्पितळात दाखल करुन, घरची मोठी अडचण असतानाही सोहळ्यात...जबाबदारीच्या व समरसतेच्या भावनेनं सहभागी झाला.

ही मान्यवर मंडळी, आयोजन करणाऱ्या, सगळ्या DRT Antheaच्या वानरसेनेसह, निवेदक किरण जंगमवर व कमिटी-सभासद मयूर कोंडेच्या उत्कृष्ट भाषणबाजीवर एकदम खूष होते, हे मला मुद्दाम तुम्हाला कळवू द्या.

शिवाय, साथीने आलेले इडिकॉनचे दिलीप राणे, हिवा-इंडियाचा 'रोहेकर' विनोद गायकवाड...तुम्हा सर्वांचं मैत्र व संघभावना पाहून अतिशय प्रभावित झाले होते. मला इडिकॉन-कंपनी, 'दिलीप' उत्तमरित्या सांभाळत असल्याने, त्या कंपनीची फारशी चिंता नाही; पण, 'हिवा'मधल्या थोड्या गढूळलेल्या वातावरणात, आता निवांतपणा आणायला, कालच्या उत्साहवर्धक कामगार-एकतेच्या वातावरणाचा प्रभाव कामी येईल...माजी कमिटी-सभासद या नात्याने 'विनोद'ची त्यामुळेच अधिकची व मोलाची मदत होईल.

तुम्ही सर्वांनी ज्या कृतज्ञतेनं व कौतुकाने नेवरेकरसाहेब व महेशसाहेबांची वारंवार मनापासून आठवण काढलीत...त्याबद्दलही, आम्ही सगळे भरुन पावलो!

कालच्या दृग्गोचर झालेल्या 'कामगार-नवचैतन्या'ने आमची सर्वांची (व्यक्तिशः माझी) खात्री झाली आहे की, जसा १५ वर्षांपूर्वी सँपट्रॉन-निलॉनमधला अडीच वर्ष चाललेला अथक कामगार-संघर्ष, फोडाफोडीतून व पोलिस-बळाचा क्रूर वापर करुन मोडीत काढला गेला...तसं रोह्यात आता तुम्ही जागे झाले असल्याने, पुन्हा होणार नाही! सगळ्याच कंपनीतील कामगार-कर्मचारीवर्गाशी जोडून घ्या, भले मग त्यांची युनियन दुसरी कुठली असली, तरीही चालेल...पण, एकमेकांच्या अडचणीत, संघर्षात एकमेकाला साथ द्या व मग, जसं शिशिर ढवळे यांनी कार्ल मार्क्सच्या, ''जगातल्या कामगारांनो एक व्हा'', या आवाहनाची आपणा सर्वांना आठवण करुन दिली; तसा रोह्यात विविध कंपन्यांतील 'कामगार-एकजुटी'चा चमत्कार घडेल...कामगारांची छळवणूक करणाऱ्या, त्यांना लुटणाऱ्या व त्यांच्या नोकऱ्या धोक्यात आणणाऱ्या...रक्तपिपासू-निर्दय-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'ला (Vampire-State System) मोठं आव्हान मिळेल!

''रायगड, हा केवळ 'शिवछत्रपतींचा पायरव' असलेला जिल्हाच नव्हे; तर, महाराष्ट्रातला लोकचळवळीसाठी सर्वात मोठं 'हौतात्म्य' देणारा जिल्हा आहे'', हे कॉ. नाना अहिरेंचे 'लाखमोलाचे बोल' विसरु नका आणि हे ही विसरु नका की, व्यवस्थापनाच्या नकारात्मक पवित्र्याविरोधात व कामगारांवरील दडपशाहीच्या विरोधात...शेजारच्याच 'अन्शूल कंपनी'त आपण नाईलाजास्तव शेवटचा पर्याय म्हणून, आजच 'संपाची नोटीस' देऊन आलोत. तेव्हा, त्या संघर्षरत कामगारांच्या पाठिशी ठामपणे उभे रहा...त्यांनाही, आर्थिक-उन्नयनाच्या 'धर्मराज्य-मोहीमे'चा घसघशीत लाभ मिळू द्या!

...तुम्हा सर्वांना मनःपूत धन्यवाद व पुन्हा एकवार उदंड कौतुक...असेच जागते रहा, पेरते रहा; भविष्यात अधिकाधिक यश, खात्रीने तुमची वाट पहात राहील...!!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

## (एका बड्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या संदर्भात, कामगारांकडून विचारल्या गेलेल्या काही प्रश्नांची, मी व्हॉटसपवर पाठवलेली उत्तरं...आपल्याही माहितीसाठी संकलित करुन खालीलप्रमाणे पाठवतोय... जरा, वाचण्याची व समजून घेण्याची तसदी जरुर घ्या)

**प्रश्न क्र. १ : प्रस्तावित 'वेतन-वाढी'बद्दलचा....**

माझं उत्तर : ५ ते ८ टक्के पगारवाढ (तीदेखील, तुमच्या छोट्या पगारावर...Small Base)...म्हणजे, जेमतेम महागाई दराशी तोंडमिळवणी केली जातेय.

...तुमची संघटनात्मक ताकद, आपल्यातल्याच गद्दार-दलालांनी...उंदीर-घुशी जशा जमीन पोखरुन ठेवतात; तशी कमजोर करुन ठेवल्याने) न्यायालयीन दप्तरदिरंगाई, कितीही त्याज्य व अस्वस्थ करणारी असली; तरी, अखेरच्या निर्णयासाठी तुम्हाला त्यावर अवलंबून रहावं, तर लागेलच!

...अन्यथा, या उन्मत्त व्यवस्थापकांच्या कधिच तोंडाला फेस आणला असता आपण; पण, काय करणार?

**प्रश्न २ : घाईघाईने वारंवार बदलल्या जाणाऱ्या 'वेतन-संरचने''बाबतचा....**

माझं उत्तर : व्यवस्थापनाकडून पगाराच्या संरचना अशास्त्रीय स्वरुपात बदलण्याची चाललेली घाई, ही सगळी नुसतीच गंडवागंडवी नव्हे; तर, व्यवस्थापनाने एकूणच पगाराच्या संरचनेसंदर्भात, जो भयंकर पक्षपातीपणा करुन ठेवलाय (व्यवस्थापनाच्या मर्जीतल्या 'गुलाम' बनलेल्या लोकांवर मेहेरनजर व आपल्या सभासद कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय) त्या सगळ्या घोटाळ्याची झाकडाळ व सारवासारव आहे... ''खेळ आधी खेळायचा आणि नियम सोयिस्कर नंतर बनवायचे'', त्यातला बदमाषीचा प्रकार आहे.

**त्यांना म्हणावं, पाश्चात्य प्रगत देशातील (उदा. UK, अमेरिका, नॉर्डिक देश, द. कोरिया इ. इ.) तुमच्या शाखांमधल्या, पगार-संरचना दाखवा किंवा तुम्ही मेहनत व हुशारी दाखवून नेटवरुन वगैरे मिळवा... म्हणजे, सगळ्या बदमाषीचा आपसूक उलगडा होईल. मोठमोठे शब्द व बोजड संकल्पना वापरायच्या व सर्वसामान्यांना गोंधळून टाकायचं, हे शोषण व अन्याय करणार्या भांडवली-व्यवस्थेचं कायम धोरण असतंच; त्यालाच, व्यवस्थापकीय-परिभाषेत** 'If you cannot convince somebody...Confuse him!'' **असं म्हणतात. बाकी, या सगळ्या दिशाभूल करणाऱ्या मांडणीला फारसा अर्थ नाही. जिथे कामगार-कर्मचारीवर्गाची ताकद कमजोर पडत जाते; तिथे असले विविध खेळ खेळले जातात** (विशेषतः, IT कंपन्यांमधून), ज्यात शास्त्रीय-संरचनेचा (Scientific Structure) तार्किकतेचा (Rationality) पूर्ण अभाव असतो... आणि, आपल्या 'DKKM' सारख्या जाज्वल्य संघटनेपुढे ही व्यवस्थापकीय चलाखी-बदमाषी टिकू शकत नाही; म्हणूनच, तिला सगळी ताकद लाऊन, संबंधित व्यवस्थापकिय मंडळींकडून विरोध केला जात रहातो!

**प्रश्न ३ : न्यायालयीन निकालांना लागणाऱ्या बेमुदत दिरंगाईबाबतचा....**

माझं उत्तर : ''एखादा न्यायालयीन-निकाल पदरात पडला; म्हणजे, मग कामगारांमध्ये आशा व प्रेरणा सळसळेल आणि कामगार, दीर्घकालीन न्यायालयीन लढ्याला मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम होतील'', हे अनेक ठिकाणच्या कामगार-कर्मचारीवर्गाचं म्हणणं समजून घेण्यासारखं असलं; तरी, वस्तुस्थिती आपल्या ठरल्या समजुतीशी बऱ्याचदा फारकत घेत फटकून रहात असते...आमचा अनेक कंपन्यांचा अनेक दशकांचा जळजळीत अनुभव, याला साक्षीदार आहे!

**न्यायालयीन-निकाल, आज न उद्या हाती येणारच, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघच! पण, कामगारांनी दीर्घकाळ वाट बघून थकून जावं, पिचून जावं...आणि, न्यायालयीन लढ्यापासून तुटून जावं; मात्र, कुठल्याही स्थितीत 'विद्रोही' (हल्लीच्या 'ढोंगी हिंदुत्ववाद्यां'च्या सरकारी-परिभाषेत 'शहरी नक्षलवादी') बनू नये...या एकमेव कुटील उद्देशाने, संपूर्ण कामगारविषयक न्यायालयीन-संरचना उभारलेली असते.**

प्रथम गुन्हेगारी खटले, त्यानंतर दिवाणी दावे आणि सगळ्यात शेवटी कामगारांचे दावे... अशी न्यायालयीन दप्तरदिरंगाईची उभीआडवी संरचना, आपल्यासारख्या देशात असते; मात्र, पाश्चात्य देशांत असा 'भेदाभेद' आढळत नाही, हे तिथल्या गौरवास्पद न्यायालयीन व्यवस्थेचं व्यवच्छेदक लक्षणच! तिथे 'अनुचित कामगार-प्रथांविरोधात (Unfair Labour Practices) कंपन्यांना फार मोठे आर्थिक दंड केले जातात व प्रसंगी संबंधित व्यवस्थापकांना मोठा तुरुंगवास भोगावा लागतो!

**प्रश्न ४ : वेतन-संरचनेबाबतचं सरकारी-धोरणाबातचा....**

माझं उत्तर : एकतर किमान-वेतनापलिकडे (जे बेकार-भत्त्याच्याही लायकीचं नसतं) सरकारचं स्वतःचं असं, कॉर्पोरेट-क्षेत्रासाठी कुठलीही, कामगारांचं आर्थिक-कल्याण करणारं वा आर्थिक-उन्नयन साधणारं, वेतन-धोरण दुर्दैवाने नसतं...एवढंच काय, या संदर्भातील न्यायालयीन निकालांसाठी वापरले जाणारे 'निकष'देखील, तकलादू स्वरुपाचे व संबंधित युनियनवरच सगळ्या नोंदी (रेकॉर्ड्स) गोळा करण्याचं ओझं लादणारे असतात; जे वस्तुतः, काम खूपच अवघड व अपुरी संसाधने असलेल्या व कायद्यांचं पाठबळ नसलेल्या युनियन्सना, अगदी थकवणारे व नामोहरम करणारे असतात.

'वेतन-आयोग' (Pay Commissions), हे सरकारी-कर्मचाऱ्यांसाठी असतात; पण त्याबाबतही भाजप-संघीय सरकारच्या कारकिर्दीत, भविष्यकालीन परिस्थिती एकूणच अवघड दिसतेय.

'वेतन-सुधारणा समिती' (PRCs...Pay Revision Committees) या खास केंद्र-सरकारच्या विविध आस्थापनांसाठी (CPSEs...Central Public Sector Enterprises) नेमल्या जायच्या; पण, आता त्यांच्याही कार्यशैलीत, कार्यपद्धतीत व संरचनेत कामगार-कर्मचारीवर्गाच्या दृष्टीकोनातून खूपच 'घातकी' बदल, एकतर याआधीच करण्यात आलेत किंवा अजूनही केले डात आहेत (जे मी स्वतः, उग्रघचच्या 'माझगाव डॉक' युनिटचा सखोल अभ्यास करताना सप्रमाण शोधून काढलं होतं... आजही वाईट एवढंच वाटतं की, जर ते माझगाव डॉकचे उतावीळ व अज्ञानी कामगार, कुणाकुणाच्या चिथावणी व दबावामुळे आपल्या DKKM युनियनला अचानक सोडून गेले नसते; तर, एव्हाना प्रत्येक कामगाराला, अगोदरच्या १५-२० वर्षांच्या सेवेतील वेतन-फरकाची सव्याज रक्कम म्हणून किमान १ कोटीहून अधिक रक्कम दरडोई नक्कीच मिळाली असती; एवढी त्यांची अनेक वर्षे पगारात प्रचंड फसवणूक व लूट होत आली होती...मागाहून पस्तावून व माझ्या हातापाया पडून, काय उपयोग? न्यायालयीन-लढा अर्धवटच सोडला त्या महामूर्ख कामगारांनी आणि आज अनेकांची स्थिती आहे की, अपुऱ्या पगाराने त्यांना 'अविवाहित' तर, रहावं लागतंच आहे; शिवाय नोकरी टिकण्याची शाश्वती अजिबात नाहीच)...

**प्रश्न ५ : परिस्थितीतून मार्ग काढण्याचे पर्याय**

माझं उत्तर : **...ज्याक्षणी (आज, उद्या किंवा भविष्यात), संबंधित कर्मचाऱ्यांचा 'कामगारधर्म' खऱ्या अर्थाने जागा होईल आणि सगळी मरगळ, सगळी गांडुगिरी व गुलामीवृत्ती सोडून ते आरपारच्या लढ्याला दंड थोपटून एकजुटीने उभे रहातील... तेव्हा, तो लढा अंतिम व निर्णायक स्वरुपाचा असेल; अशा जातिवंत-जाज्वल्य संघर्षाला, न्यायालयीन लढा केवळ 'पूरक' ठरेल...मुख्य लढा, रस्त्यावरचाच राहील आणि त्यावेळेस माजोऱ्या, उन्मत्त व अत्याचारी व्यवस्थापकिय मंडळींच्या नाकात वेसण व गळ्यात पट्टे घालून त्यांना आपण खात्रीने रस्तोरस्ती फिरवू, जय हो!**

...ही केवळ, कुठली 'कविकल्पना' नव्हे; ''अति झालं की, माती होते'' या उक्तिनुसार, गवताला भाले फुटताना, आम्ही अनेक संघर्षात गेली ४० वर्षे पहात आलोयत... कुठलाही संघर्ष, या सगळ्या अनुभवविश्वाला 'अपवाद' कसा असेल?

**प्रश्न ६ : CTC (Cost To the Company) बाबतचा....**

माझं उत्तर : ...लक्षात ठेवा, CTC ही तद्दन फसवी व्यवस्थापकिय संकल्पना आहे!

जसे आपल्याला बिल्डर्स, Carpet Area (ज्या चटईक्षेत्रावर आपण खरंतर वावरतो, वावरु शकतो) ऐवजी, Built up, Super Built up, Supra Built up वगैरे 'डोकेबाज व धोकेबाज' संकल्पना प्रसवून व पसरवून फसवतात...त्याच श्रेणीतील, ही व्यवस्थापकिय फसवणूक आहे...त्यावर, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचं (DKKM) कायम प्रतिपादन राहिलेलं आहे की, आम्हाला CTC ही, एक प्रकारची 'चहा पावडर' आहे, एवढंच माहिती आहे, बस्स्!

जो पगार महीनाअखेर थेट हाती येतो व संसारखर्चाच्या कामी येतो...तोच खरा पगार. थोडक्यात, वर्षभरात संसारासाठी लागणारी मोठ्या किंवा भांडवली खर्चाची रक्कम (वार्षिक-बोनस वगैरे) देखील पगाराला जोडून पगार खोटा फुगवणं आणि निवृत्तीनंतरच्या 'आधाराची काठी' (PF, Gratuity इ.) तरुणपणीच मोडून टाकणं; ही व्यवस्थापकिय डँबिसगिरी म्हणजेच, CTC.. !!!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

# अंकल सॅमचा ‘सरेंडर’ खेळ : जागतिक राजकारणातील दुटप्पी धोरणे


लहानपणी आपण सर्वचजण, हा खेळ निरनिराळ्या नावाने खेळलेला आहे... सध्या सुरु असलेल्या अमेरिकेन स्पॉन्सर खेळाचे नाव आहे, ‘‘अंकल सॅम’’ म्हणतो!

**अंकल सॅम इराणबरोबर वाटाघाटी करत होता, इराणने अण्वस्त्रे बनवू नयेत म्हणून... इराणनेदेखील मान्यता दिली होती. सह्या होणार होत्या... आता, अंकल सॅम अचानक उठला आणि इराणवर बॉम्ब टाकायला लागला. इराणच्या राष्ट्राध्यक्षांना ठार मारले. आता माझ्या मर्जीप्रमाणे इराण चालेल म्हणतो. मधल्या काळात इराण उध्वस्त आणि मध्यपूर्व देशात विध्वंस सुरु आहे. तेलामुळे जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे. येत्या काही दिवसात काय घडेल, या चिंतेने सारे जग त्रस्त आहे!**

अंकल सॅम म्हणाला होता, आम्हाला नाटोमध्ये (NATO) युक्रेन हवे आहे, आम्ही युक्रेनचे दोस्त आहोत... युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आमचे हिरो आहेत. आता अंकल सॅम म्हणतो, आमचा युक्रेन नाही, रशिया दोस्त आहे. अंकल सॅम युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्कींना वाईट्ट वागणूक देतो. युद्ध थांबवून मला नोबेल द्या म्हणतो. मधल्या काळात हजारो माणसे मेली, लाखो लोकांची घरे, शहरे, पायभूत सुविधा उध्वस्त झाल्या. मानवी यातनांचे तर, डॉलरमध्ये मूल्यदेखील काढता येणार नाही. यातून बाहेर यायला काही पिढ्या आणि काही ट्रिलियन डॉलरचे भांडवल लागेल.

अंकल सॅम म्हणाला होता, सर्वांनी आपापल्या अर्थव्यवस्थांचे दरवाजे सताड उघडे ठेवा. सीमारहित देश हवेत, आयात-निर्यात मुक्त हवी. यापुढे जागतिक व्यापार संघटना (WTO) जागतिक व्यापाराचा मॉनिटर असेल. सर्वांनी तो मॉनिटर जे म्हणेल ते ऐकले पाहिजे. आता अंकल सॅम म्हणतो, आता मला आमच्या अर्थव्यवस्थेचे स्वसंरक्षण करायचे आहे, त्यासाठी त्याने भरपूर आयात कर लावले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम झाला, याची त्याला फिकीर नाही. मधल्या काळात अनेक गरीब आणि विकसनशील देशांमध्ये निर्यात-प्रधान उद्योग वाढवा म्हणून, हजारो कोटींची केलेली गुंतवणूक आणि रोजगार आता धोक्यात येऊ शकतात. या देशांची चलने घसरुन महागाई वाढू शकते. स्थूल-अर्थव्यवस्थेवर अनेक विपरीत परिणाम होऊ शकतात. अंकल सॅमने नेमलेला मॉनिटर बिळात जाऊन बसला आहे. कोण जबाबदार?

**अंकल सॅम म्हणाला होता, आम्हाला स्वस्तात मानवी श्रम विकणारे श्रमिक हवे आहेत... तर तुम्ही आमच्या देशात या, आमच्या देशातील मुलामुलींचा उच्च शिक्षणाकडे कल नाही. तुमच्या देशातील मुलांना डॉलरमध्ये फिया भरुन, कर्जे काढून, आमच्या उच्च शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थी म्हणून पाठवा, आम्ही त्यांना जॉब देऊ. आता अंकल सॅम म्हणतो, तुम्ही भले अनेक वर्षे आमच्या देशात स्थलांतरित म्हणून राहत असाल; पण, तुमच्याकडे आम्हाला पाहिजे तशी कागदपत्रे नाहीत. आता आम्ही एकेकाला निवडून निवडून हातात आणि**





**पायात बेड्या घालून त्यांच्या मायदेशी पाठवणार...** मधल्या काळात, जगातील अनेक गरीब विकसनशील देशांमध्ये स्थलांतरितांच्या कुटुंबात प्रचंड अनिश्चितता आहे. कर्ज काढून अमेरिकेतील युनिव्हर्सिटीना, मिलियन डॉलर्सचा धंदा दिलेले विद्यार्थी, शिक्षणासाठी काढलेले कर्ज कसे फेडायचे या चिंतेत घालवणार आहेत.

**आंतरराष्ट्रीय पातळीवर असे बरेच अंकल सॅम नेहमीच असतात. अगदी इतिहासात डोकावले तरी कळेल. त्यांना अंधभक्त फॉलोवर्स देश लागतात. ठीक आहे; पण, त्यांच्या त्या ‘‘सरेंडर’’ खेळात सामील व्हायचे की नाही हे त्या त्या देशाने ठरवायचे असते. अट एकच... कणा ताठ हवा !!!**

***....संजीव चांदोरकर***

# देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे

प्रबोधनकार ठाकरे ‘देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे’ या पुस्तकात लिहितात शंकराचार्यांनी ब्राह्मणीधर्माच्या पुरस्कारासाठी बौद्धधर्माचा नायनाट केला आणि अस्पृश्यता निर्माण केली.




शंकराचार्यांनी ब्राह्मणीधर्माच्या पुरस्कारासाठी बौद्धधर्माचा नायनाट केला त्यातल्या सुडाची नांगी इतकी भयंकर जहरी व खूनशी होती की, चालू घटकेपर्यंत बौद्धधर्माचा दिवसाढवळ्या अपमान व उपहार करीत आहे.

ठिकठिकाणच्या बौद्ध विहारांच्या पवित्र वास्तूंचा आणि बौद्ध मूर्तीचा उच्छेद केला आणि तेथे शंकराच्या पिंड्या थापल्या. कित्येक ठिकाणी तर, बुद्धाच्या मूर्तींना थोडा बहुत फरक करून त्यांना शंकर मूर्तीचा बाप्तिस्मा दिला. अशा रीतीने बौद्ध विहाराचे रूपांतर शंकराच्या देवळात झाले.

जोपर्यंत चिलीम नव्हती तोपर्यंत गांजाची जरूर कोणालाच नव्हती. देवळाच्या चिलमी निघाल्यावर निरनिराळ्या देवांना गांजा पिकवायला हिंदूंच्या तरळ कल्पनेला कसला आयास?

शंकराची देवळे निघतात न निघतात तोच, गणपती सोंड हलवीत, मारुती गदा झेलित, बन्सीधर कृष्ण मुरली मिरवीत एका मागून एक हजर.

समाज बहिष्कृत पडल्यामुळे अस्पृश्य ठरलेल्या लक्षावधी लोकांनाही आपल्या जीवाच्या समाधानात मसोबा खोसोबा चींडोबा असे अनेक ओबा देव सध्या दगडांना शेंदूर फासडून निर्माण केले.

आद्य शंकराचार्यांनी रक्तपाताच्या अत्याचारी पुण्याईवर पुनर्जीवित केलेली भिक्षुक शाहीजशी जशी थरथरू लागली तस तशी जातीभेदाची आणि देवळाची पैदास डुकरीणीच्या अवलादीलाही बरे म्हणून लागली. हिंदू देवळांची उत्पत्ती ही अशीच झालेली आहे.

हिंदुजनांच्या मनात बौद्ध द्वेषाची पेरलेले भिक्षुकशाही विष आज कसे थैमान घालीत असते हे वाटेल त्या बौद्ध लेण्यात पाहून घ्यावे.

बुद्धाचा अहिंसावाद हवेत वितळला ताबडतोब प्रत्येक लेण्यात एकेका देवाची देवीची देवळे उगवली आणि त्यांना कोंबड्या बकऱ्यांच्या कंदोऱ्यांनी संतुष्ट करणाऱ्या भक्तजनांच्या टोळ्या लाखांनी मोजण्या इतक्या फुगल्या.

यावेळी अठरा पुराणाची ही भटी पैदास झालेली असल्यामुळे हिंदू समाजातील व्यक्तीमात्राची नातीगोती जरी जातीभेदाच्या घरटात वस्त्रगाळ भरडली गेली होती. तरी देवाच्या आणि देवीच्या गोतावळ्याची जाळी सताड मोकाट सुटलेली होती. माणसाप्रमाणे...

# तेंव्हा तर भाजपचा ओएनजीसीलाही विरोध होता

आज तेल संकटाने साऱ्या जगाला ग्रासलेले असतांना या क्षेत्रात कोणत्याही देशाने आत्मनिर्भर होणे किती आवश्यक आहे ते वेगळे सांगायची गरज नाही. १९४७ साली भारत आपल्या गरजेच्या ९०% पेक्षा जास्त तेल आयात करत असे. त्यामुळे पंडित नेहरूंसारख्या द्रष्टया नेत्याने ७० वर्षांपूर्वीच ओळखले होते की, खऱ्या स्वातंत्र्यासाठी ऊर्जा-स्वावलंबन आवश्यक आहे. त्यांनी केशवदेव मालवीय यांच्यासारख्या एका अत्यंत कार्यक्षम व्यक्तीला आधी उपमंत्री म्हणून मंत्रिमंडळात घेतले आणि त्यांनी १९५३ ते १९६३ या कालावधीत ओएनजीसीची स्थापन करून तिला स्थिरस्थावर केले.

पण, अशा प्रकारे स्वावलंबन मिळविण्याची पावले उचलण्यासाठीही तत्कालीन विरोधकांनी (आजच्या सत्ताधाऱ्यांनी) विरोध केला हे खरे तरी वाटेल का? आज अगदी विधायक टिकेलाही ''विरोधक राजकारण करत आहेत'' असे जे लोक हिणवतात, त्यांनी ओएनजीसीसारख्या कंपनीच्या स्थापनेलाही विरोध केला होता हा इतिहास आहे, जो फार माहीत नाही.

जेव्हा रशियन तंत्रज्ञानाच्या मदतीने भारताने या क्षेत्रात उतरण्याचे ठरविले, तेव्हा त्याकाळी सुरुवातीच्या काळात जनसंघाचे नेते, विशेषतः डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि नंतर अटलबिहारी वाजपेयी, बळराज मधोक, यांनी या धोरणाला कडाडून विरोध केला होता. संसदेत या पक्षाचे खासदार या विषयावर आक्रमक असत. तसेच राजगोपालाचारी, मिनू मसानी आणि अशोक मेहता यांच्यासारख्या समाजवादी आणि स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांनीही ओएनजीसी हा पांढरा हत्ती ठरेल म्हणून त्याला विरोध केला होता.

Government has no business to be



in business असे या लोकांचे म्हणणे होते. ONGC सारखी मोठी सरकारी संस्था स्थापन झाली तर भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता वाढेल, अशी टीका जनसंघाचे नेते संसदेत करत. त्याशिवाय त्यांचे म्हणणे असे होते की हा चुकीचा प्राधान्यक्रम आहे आणि भारताने आधी शेती आणि लघुउद्योगांवर पैसा खर्च करावा. तेल शोधण्यासारख्या 'हाय-रिस्क' क्षेत्रात कोट्यवधी रुपये उडवणे हे भारतीय अर्थव्यवस्थेला झेपणार नाही अशी खिल्ली ते उडवत.

या सगळ्या टीकेला न जुमानता नेहरू सरकारने तेल क्षेत्रात आपले स्वावलंबनाचे धोरण कायम सुरू ठेवले आणि ओएनजीसी प्रगती करत राहिली. एवढेच नव्हे; तर, भविष्यात देशाच्या ऊर्जेच्या गरजेला पुरेल एवढे तेलाचे आणि वायूचे साठे देशात नसणार हे ओळखून १९५८ मध्येच तत्कालीन केंद्र सरकारने परदेशातदेखील तेल उत्खननाचे हक्क घेण्याचे ठरविले. परिणामी आज ओएनजीसी रशिया, ब्राझील, क्यूबा, इराण, इराक, सीरिया, युएई, व्हेनेझुएला, कोलंबिया, कझाकस्तान, म्यानमार अशा १७ देशात तेथील उत्खननाचे हक्क मिळवून ते तेल भारतात आणले जाते.

आज ओएनजीसी देशातील सर्वात मोठी सरकारी मालकीची तेल आणि नैसर्गिक वायू शोधणारी व उत्पादन करणारी संस्था आहे. भारताच्या एकूण देशांतर्गत कच्च्या तेलाच्या उत्पादनापैकी सुमारे ७० टक्के आणि नैसर्गिक वायूच्या उत्पादनापैकी सुमारे ८४ टक्के वाटा या संस्थेचा आहे. ओएनजीसी जगातील फॉर्च्यून ५०० कंपन्यातील एक असून तिचे market capitalization ३,३०,००० कोटी रुपये आहे.

नेहरू म्हणजे केवळ आयआयटी, आयआयएम, एम्स, धरणे, औद्योगिक प्रगती नाही. ते तर महत्त्वाचे होतेच. पण, त्या महापुरुषाने कोण कोणत्या क्षेत्रात आपल्या दूरदर्शी धोरणांनी देशाच्या उज्वल भविष्याचा पाया घालून ठेवला आहे ते असे कधी कधी अचानक समोर येते आणि अचंबित व्हायला होते. आणि त्यांच्या या धोरणांना विरोध करून त्यांच्या पायात खोडा घालण्याचे काम करणारे लोक विचारांचा किती संकुचित आवाका असणारे होते ते देखील पुन्हा पुन्हा सिद्ध होत असते. पुढे अशाच प्रकारे राजीव गांधींच्या संगणकीकरणाच्या धोरणालाही विरोध होत होता हा तर फार जुना नसलेला हास्यास्पद इतिहास आहे.

*...सुनिल सांगले*

# नव-उदारमतवादी म्हणतात, डोनाल्ड ट्रम्प आमच्या सिलॅबसमध्ये नव्हता

माझ्याच वयाचा मित्र, नव्वदीपासून नव-उदारमतवादी आर्थिक तत्वज्ञानाचा कट्टर पुरस्कर्ता राहिला आहे. त्याचा ताप गेली ४५ वर्षे उतरलेलाच नाही. आमचे नेहमी मैत्रीपूर्ण वाद व्हायचे. त्याचे आपले तेच पालुपद, देशांतर्गत सर्व काही मार्केटवर सोपवले पाहिजे, राष्ट्रांच्या सीमा नकोत, जगात मुक्त व्यापार हवा, सरकारने अर्थव्यवस्थेतून बाजूला व्हायला हवे इत्यादी... अलिकडे बऱ्याच दिवसांनी भेटला. गप्प गप्प होता, थोडा नर्व्हस होता. मी म्हटले की, डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आला, त्याने आयातकरापासून अनेक बिगर आर्थिक क्लुप्त्या वापरुन, जागतिक व्यापाराचा सारीपाट उधळून लावला. जागतिक व्यापाराचे महामंत्र सर्व राष्ट्रांना म्हणायला लावणारी, 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन' अचानक अदृश्य झाली. इराण युद्धाने तर, संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा-संकटामुळे कड्यावर उभी केली गेली. आमच्याच देशाचे हित सर्वप्रथम, बाकीची राष्ट्रे गेली खड्ड्यात म्हणू लागला. देशांवर हल्ले केले, युद्धे छेडली. बाकीचे जाऊदे, तो खुद्द अमेरिकेची अर्थव्यवस्था डबघाईला आणणार आहे... आणि, हे कोणत्या देशात? तर, नव-उदारमतवादाचा पुरस्कर्ताच नाही; तर, ड्रायव्हिंग फोर्स असणाऱ्या खुद्द अमेरिकेत!

माझ्या मित्राला विचारले की, तुम्ही नव-उदारमतवाद्यांचे ट्रम्प यांचे विश्लेषण काय आहे? कोठे गेला मुक्त जागतिक व्यापार? कोठे गेली जगाला छडी घेऊन जागतिक व्यापाराची तत्वे शिकवणारी, तुमची ती डब्ल्यूटीओ? तर तो म्हणाला, डोनाल्ड ट्रम्प आमच्या सिलॅबस मध्ये नव्हता!

मी विचारले... पण, ते सिलॅबस बनवले होते कोणी? हे बरं आहे, आपणच सिलॅबस बनवायचे, आपणच पेपर सेट करायचे, आपणच परीक्षक. आपणच जाहीर करायचे की, आपण डिस्टिंक्शनने उत्तीर्ण झालो आणि आता म्हणायचे, आताच पेपर सिलॅबस बाहेरचा आहे. शिवी घालून म्हणालो, मधल्या या दशकात जगातील शेकडो कोटी लोकांना अजून गाळात ढकलले. जगातील एक टक्का, फार तर पाच टक्के लोकांना त्यांच्या पुढच्या शंभर पिढ्या बसून खातील अशी संपत्ती कमावून दिलीत, पर्यावरणाची मारुन ठेवलीत, ज्याची किंमत न जन्मलेल्या पिढ्या भोगणार आहे. बरं ते जाऊदे... मी मित्राला म्हणालो, तू ४० वर्षे नव-उदारमतवादाच्या चिपळ्या वाजवतो आहेस; तर, जे नव-उदारमतवादाचे लाभार्थी आहेत, त्यांनी एक/दोन कोटी किंवा काही लाख रुपयांचे तुकडे तरी फेकले का तुझ्यासमोर? फूट सोल्जर रे तुम्ही!

अंधभक्त प्रत्येक क्षेत्रात असतात. नव-उदारमतवादाने तर, मोहीम उघडलीय अंधभक्तांच्या टोळ्या बनवण्याची, विश्वविद्यालये, मीडिया, नोकरशहा, बँकर्स, थिंक टँक्समध्ये. नव्वदीच्या दशकात, नव-उदारमतवादी आर्थिक तत्त्वज्ञानाच्या विचारांचा व्हायरस जगभर पसरवला गेला. कोरोनानंतर आला. कोरोना जिवाणूंचा पर्सनल अजेंडा तरी नव्हता. नव-उदारमतवादाचा खतरनाक पर्सनल अजेंडा होता आणि आहे. कोरोना महामारी संपली... पण, नव-उदारमतवादी आर्थिक विचारांचा व्हायरस अजूनही हवेत आहे. डोनाल्ड ट्रम्प, मागा आंदोलन, जगभरातील फॅसिझम, अतिरेकी राष्ट्रवाद हे नव-उदारमतवादाचे अपत्य आहे.

**तरुणांना आवाहन...**

व्हायरसला बळी पडायचे नसेल तर, अंगी प्रतिकारक्षमता बाणवावी लागते. डावी/उजवी बायनरी फसवी आहे. ओरिजनल समोर दिसत आहे, त्याला फेसव्हॅल्यूवर न घेता, प्रश्न विचारण्याचे धैर्य देणारी ओरिजिनल विचारक्षमता म्हणजे प्रतिकारक्षमता, ती अंगी बाणवा. आमची पिढी पुढच्या काही वर्षांत, काळाच्या पडद्याआड जाणार आहे. ही पृथ्वी, हा निसर्ग, हा समाज, देश, देशांतर्गत आणि देशाबाहेरील सौहार्द तुमच्या हातात असणार आहे. तुमच्या मुलाबाळांचे भवितव्य त्यावर निर्भर असणार आहे !!!

*....संजीव चांदोरकर*

# असा समाज साथीच्या आजाराने मरणाच्याच लायकीचा असतो!!

अध्यात्म आणि श्रद्धेच्या नावावर दोनहजार पेक्षा जास्त महिलांना मूत्र पाजून त्यांच लैंगिग शोषण करणारा, त्याचे व्हिडिओ बनविणारा कॅप्टन खरात या विकृत माणसाचे जे कृष्णकृत्य बाहेर आले आहे, ते माणसावरचा विश्वास उडून जावा इतके अमानुष आहे. पण, यामधे केवळ तो एकटाच दोषी आहे का? त्यासोबत अनेक राजकीय नेते, उच्च पदस्थ अधिकारी यांचे जे नेक्सस आहे, त्याचे आकलन कसे करायचे? समाजमाध्यमावर जे काही व्हिडिओ प्रसारीत झाले आहेत, यावरून हे प्रकरण किती गंभीर याचा आपणाला काही कल्पना येवू शकते. सर्वात महत्वाचे म्हणजे, महाराष्ट्राच्या १३ कोटी जनतेचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्रातल्या अनेक राज्यकर्त्यांचा तो आध्यात्मिक गुरु आहे. काय लायकीचे राज्यकर्ते आहेत आणि त्याला राज्यकर्ते बनवणारी जनता ही काय बौद्धिक, नैतिक लायकीची आहे? पण हे बोद्धिक स्खलन पाहिलेच आहे का ?

२०१८ साली जेंव्हा कोरोनाने जगात हाहाकार माजवला तेंव्हा सारं जग कोरोनाविरोधात शास्त्रीय पध्दतीने लढत होते. कोणी रात्रीतून हॉस्पिटल उभारत होते, कोणी रात्रंदिवस लस शोधण्याचे काम करत होते, कोणी रुग्णालयाचे राष्ट्रीयकरण करत होते.

आणि एक भारत होता, जो मूळ समस्येवर काम करण्याऐवजी देशातील समस्त जनतेला, कोरोनाला घालवण्यासाठी टाळ्या आणि थाळ्या वाजवायला सांगून मध्ययुगात नेऊन अंधश्रध्देच्या खाईत लोटत होता. गोमूत्र, शेण खाण्यानंतर कोरोनाला नष्ट करण्यासाठी ताट, टाळ्या वाजवून, फटाके फोडून आपण आपलं जगासमोर हसू करुन घेत होता पण सुद्धा ही काही पहिलीच वेळ नव्हती.

जो समाज स्वतःच्याच अनुभवातून ...चुकीतून नव्हे तर, दुसऱ्याच्या ही अनुभवातून चुकातून शिकतो त्याला शहाणा समाज म्हणतात, परंतु जी व्यक्ती... समाज ...स्वतःच्या चुकांतून ...अनुभवातून ही शिकायला तयार नसेल ती ''तद्दन मूर्ख'' तर असतेच पण माणूस म्हणून ही जगण्याच्या लायकीची नसते.

१५ व्या १६ व्या शतकात जेंव्हा युरोपमध्ये साथीचे रोग आले तेंव्हा, या युरोपच्या लोकांकडे ना गटारी होत्या ना रस्ते होते ...ना त्यांना हायजीनची सुविधा होती. ते घाणेरडे राहायचे. युरोपियन लोकांमध्ये प्लेग आला आणि हजारो लोक मेली, पण त्या प्लेगमुळे सर्व युरोपमध्ये एक नवा दृष्टिकोन आला... नवे मॅनर्स आले. उदारणार्थ: हात धुणे, प्लेट धुणे, चमच्याने खाणे, शिंकले की सॉरी म्हणणे ...ब्लेस यु म्हणणे ...नाका तोंडावर रुमाल धरणे, ही युरोपियन लोकांची प्लेगची मेमरी आहे. युरोपमध्ये प्लेगला रिस्पॉन्स म्हणून काय केलं? तर, त्यांनी स्वतःचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढवला, स्वतःला टोकाचे रॅशनल बनवले. कारण त्या प्लेगने त्या क्षणाला त्यांच्या लक्षात आणून दिले होते की, आपण हजारो वर्ष चुकीचे मूल्य ...चुकीचे दृष्टिकोन ..चुकीच्या धारणा घेऊन जगत आलो आहोत. आणि त्याची मनुष्य म्हणून भयंकर किंमत मोजली आहे आणि हे यांच्या समाज म्हणून लक्षात आलं त्या दिवसापासून त्यांनी स्वतःला आमूलाग्र बदलून घेतलं. स्वतःची विचार प्रक्रिया बदलली, आपली आदर्श बदलली, आपली मूल्यव्यवस्था बदलली आणि स्वतःची मानसिकता बदलली.. शहरांची रचना बदलली... प्रशासनात कमालीची शिस्त आणली ...आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, आपले विज्ञान पक्के करून घेतले.



भारतीय माणसांनी काय केले? आपला रिस्पॉन्स अशा गोष्टीला काय आहे; तर, १८९७ मध्ये उद्भवलेल्या महाभयंकर जीवघेण्या प्लेगची साथ आटोक्यात आणण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून रात्रंदिवस प्रयत्न करणाऱ्या आणि प्लेगची साथ आटोक्यात आणून लाखो लोकांचे जीव वाचवणाऱ्या रँडचे उतराई होण्याऐवजी चाफेकर बंधूंनी धर्म-संस्कृती बुडवतो म्हणून त्याची हत्या केली होती.

या प्लेगच्या साथीमध्ये हा प्लेग ऑफिसर असणारा रँड पुण्यातील सर्व जातीधर्माच्या लोकांना त्यांच्या घरातून काढून दवाखान्यात भरती करायचा, त्यांच्यावर उपचार करायचा. खरंतर त्याबद्दल माणसांनी कृतज्ञ असायला हवं होतं, परंतु धर्म संस्कृतीचा अभिमान बाळगणाऱ्या व टिळकांचे अनुयायी असणाऱ्या फैनेटिक चाफेकर बंधूनी हा रँड आमची धर्म संस्कृती बुडवतो आहे म्हणून त्याचा खून केला.

बंगालच्या दुष्काळामध्ये आम्ही साठ लाख लोक गमावली परंतु दुष्काळाला वैज्ञानिक पद्धतीने कसं सामोरं जायचं याबद्दलचा कोणताही नवा दृष्टिकोन आम्ही आजपर्यंत शोधू शकलो नाही. या देशात विज्ञान शिकवले जाते, पण विज्ञानाचा इतिहास कधी शिकवला जात नाही. भारतीय मानसिकता दुसऱ्याच्या अनुभवातून नव्हे; तर, स्वतःच्या अनुभवातून सुद्धा कधी शिकत नाही आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा भारतीय माणूस प्रचंड हिप्पॉक्रेट्स.. ढोंगी आहे. एका बाजूला डॉक्टर आणि कामगारांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करायची आहे म्हणून, तो त्यांनी टाळ्या वाजवल्या आहेत असं म्हणतो आहे; परंतु, दुसऱ्या बाजुला त्यांच्या जगण्या-मरण्याचा परस्थितीत सुद्धा ते कामगार कामावर आले नाहीत म्हणून, त्यांचा जगण्यापुरता पगारही त्याला कामावर न आल्यामुळे तो त्याला द्यायला तयार नाहीत. या कठीण परिस्थितीत ही त्याच्या मानवी अधिकाराची यांना काळजी नाही. पण, टाळ्या आणि थाळ्या वाजवून कृतज्ञता.!! त्यांच्या सुरक्षिततेबद्दल त्यांच्या जगण्याच्या प्रश्नाच्याबद्दल त्याला मदत करून त्याच्या प्रती खरी कृतज्ञता दाखवता येऊ शकते. परंतु त्यांच्या जगण्या मरण्याचे मूलभूत प्रश्न नाकारून अशा फुकटच्या दातृत्वाच्या टाळ्या आणि थाळ्या वाजवून ती कृतज्ञता व्यक्त करतो. इतकी ''निचता आणि ढोंगी'' जमात जगाच्या पाठीवर कुठेच नसेल.!!

या भारतीय समाजात विज्ञान शिकवले जाते परंतु विज्ञानाचा इतिहास कधी न शिकवल्यामुळे, भारतीय माणूस विज्ञान आणि आधुनिक मूल्यापेक्षा कायम आपल्या धर्माचे ...रूढी परंपरेचे आणि संस्कृतीचे गोडवे गात आला आहे.आणि आमच्या रूढी धर्मपरंपरांचं कशा वैज्ञानिक आहेत... वैश्विक आहेत. अश्या शेंगा झोडत राहतो. आम्ही हजारो वर्ष कसे या देशात टिकून आहोत अशी आपला उर बडवत आलेला आहे; परंतु, यांच्या या वृत्तीबद्दल बाबासाहेब आंबेडकरांनी यांना सुनावलं होतं की, ''तुम्ही भलेही या देशात हजारो वर्षांपासून टिकून असाल, परंतु तुमच्या टिकण्याची ..तुमच्या जगण्याची तुमच्या माणूस म्हणून विकसित होण्याची गुणवत्ता काय आहे?'' आणि आजही २१ व्या शतकाकडे जाताना माणूस म्हणून ज्या ''वैज्ञानिक आणि सामाजिक चेतनेचा विकास'' पाहता, तुमच्या टिकून राहण्याची काय गुणवत्ता आहे? केवळ टिकून राहणे एवढीच एक गोष्ट महत्त्वाची नसते, त्या जगण्याची गुणवत्ता ही महत्वाची असते. कोरोनाला घालवण्यासाठी कोरोनला गोमूत्र पाजत ..आणि स्वतःही पीत आणि त्याला खीर पुरी खाऊ घालत ''गो कोरोना ..गो'' म्हणत आपण ज्या टाळ्या आणि थाळ्या वाजवून आपली काय गुणवत्ता आहे? हेच सिद्ध केले ना! अध्यात्म आणि श्रद्धेच्या नावाखाली हा भोंदू बाबा हजारो महिलांना आपले लिंग चाटायला लावून त्यांना मूत्र पाजतो आणि हजारो महिला, राजकारणी याला आध्यात्मिक उपलब्धी म्हणतात. शी! काय लायकीची ही अध्यात्मिकता आहे! हेच पुन्हा एकदा विज्ञान आणि नव्या तंत्रज्ञानाच्या युगात सिद्ध केले आहे.

या टाळ्या आणि थाळ्याच राजकारणही समजून घेतलं पाहिजे. या... टाळ्यातून थाळ्यातून मोदीने ...पृष्ठ क्र. ७ वर

# सत्ता-सेक्स-संपत्तीचा सौदाबाज सत्संग

... ज्ञानेश महाराव (ज्येष्ठ पत्रकार - संपादक)

**बाबा-बुवांच्या कहाण्या त्यांच्या गुंगवून टाकणाऱ्या वाणीपेक्षाही सरस असतात. पण फाइव्ह-स्टार ''राम रहीम'' बाबाची कहाणी अधिकच सैराटी आहे. त्याच्या बुवाबाजीचा भांडाफोड करणाऱ्या पत्रकाराच्या खून प्रकरणातून त्याची कोर्टाने निर्दोष सुटका केलीय. ती कशाची साक्ष आहे?**

''मोदी सरकार'' २०१४मध्ये सत्तेत येण्यापूर्वीच भक्तांच्या मुलींवर बलात्कार केल्याच्या प्रकरणात आसाराम बापू, मुलगा नारायण साई याच्यासह जेलबंद झाला होता. त्यावेळी निघालेल्या निषेध मोर्च्यात आणि चर्चांत ''संघ-भाजप परिवार'' संघटना ''काँग्रेस आघाडी सरकार''ला हिंदुविरोधी ठरवत आघाडीवर होत्या. ''मोदी सरकार'' सत्तेत आल्यावर आसारामबापूची सुटका होईल, अशा बाता मारल्या जात होत्या. प्रत्यक्षात उलटे झाले. रामपाल महाराज (हिस्सार, राजस्थान), रामवृक्ष यादव (मथुरा, उत्तर प्रदेश), राम रहिम (सिरसा, हरयाणा) असे आणखी तीन ''राम'' त्यांच्या बदकर्मी व्यवहारामुळे आसारामप्रमाणेच तुरुंगात गेले. रामपालचा हिस्सार येथे ''सतलोक आश्रम'' होता. तिथे आपल्या अनुयांना कैदेत ठेवणे आणि २६ भक्तांचा खून करणे, ह्या आरोपांखाली त्याला २०१४ मध्ये अटक झाली. या पोलीस कारवाईच्या वेळी झालेल्या संघर्षात सहाजणांचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा निकाल २०१८ मध्ये लागला. त्यात रामपाल ह्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. दरम्यान, जून २०१६ मध्ये रामवृक्ष यादव याच्यावर पोलीस कारवाई झाली. तो स्वतःला ''बाबा जयगुरू देव''चा वारसदार समजायचा. त्याने ''आझाद भारत वैदिक वैचारिक क्रांती सत्याग्रही संप्रदाय'' स्थापन करून आपल्या सत्संगासाठी मथुरेतील ''जवाहर बाग'' परिसरातील २८० एकर सरकारी जमीन हडप केली होती. तिच्या रक्षणार्थ त्याने आपल्या अंधभक्तांचे सशस्त्र दल तयार केले होते. (त्यामुळे त्याच्यावर देशद्रोहाचाही गुन्हा लागला.) त्यांच्यात आणि कारवाई करणाऱ्या पोलिसांत गोळीबारी झाली. त्यात दोन पोलीस अधिकाऱ्यांसह २६ लोकांचे जीव गेले. रामपाल आणि रामवृक्ष यांना अटक करण्यासाठी पोलीस व सुरक्षारक्षक दलाला आठवडाभर झगडावं लागलं.

आसाराम ''रेपिस्ट'', रामपाल ''टेररिस्ट'', रामवृक्ष ''गँगस्टर'' ; तर बाबा राम रहीम हा ''तूने तिरखी आँखो से देखा/तो मेरा सिस्टम हिल गया - असली सेक्साट गाणी स्वनिर्मित सिनेमात हिरो बनून हिरोईनला उद्देशून म्हणणारा ''परमपूज्य''! त्याच्यावर त्याच्याच आश्रमातील दोन साध्वींचं लैंगिक शोषण केल्याचा आरोप होता. त्यावर ऑगस्ट २०१७ मध्ये पंचकुला कनिष्ठ न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आणि राम रहिमला १० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. त्यानंतर दीडवर्षांनी विशेष सीबीआय न्यायालयाने आणखी एका प्रकरणात (११ जानेवारी २०१९ रोजी) १० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली. ती पुराव्याअभावी रद्द करण्याचा निर्णय नुकताच पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाने दिलाय. २० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा १० वर्षांवर आलीय. त्यामधून राम रहिमचा महिमा टिकून असल्याची साक्ष मिळते.

ही रद्द केलेली शिक्षा ''दैनिक पूरा सच''चे संपादक रामचंद्र छत्रपती यांच्या हत्येशी संबंधित आहे. कॉलेजमध्ये शिकत असतानाच रामचंद्र छत्रपती यांनी ध्येयनिष्ठ पत्रकारितेचा ध्यास घेतला होता. २०००मध्ये त्यांनी ''पूरा सच'' नावाचं सायंदैनिक सिरसामधून प्रकाशित करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून बाबा राम रहीम हा ''संत नसून सैतान आहे'', असं सांगणाऱ्या बातम्या यात नियमित छापून येत. बाबाच्या दबावाला बळी न पडता रामचंद्र छत्रपती यांनी बाबाने बलात्कार केलेल्या महिला शिष्येचं पत्रही छापलं होतं. त्यामुळेच हे प्रकरण लोकांसमोर आलं. अन्यथा तिने पाठवलेली पत्रं संबंधितांनी दुर्लक्षितच केली होती. परिणामी, २४ ऑक्टोबर २००२ रोजी घराबाहेर पडणाऱ्या रामचंद्र छत्रपती यांच्यावर दोन बाईकस्वारांनी गोळ्या झाडल्या. चार आठवडे हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी अपयशी झुंज दिल्यानंतर २१ नोव्हेंबरला त्यांचं निधन झालं. त्यानंतर राज्यभरातल्या पत्रकारांनी एकत्र येऊन न्यायासाठी लढा दिला. न्या. राजेंद्र सच्चर यांच्यासारखे मान्यवरही त्यासाठी आग्रही होते. त्यामुळे सरकारला ते प्रकरण ''सीबीआय''कडे द्यावं लागलं. त्या प्रकरणाचा निकाल लागण्याआधीच, १९९९ मध्ये दोन महिला भक्तांवर त्याने केलेल्या बलात्काराचं प्रकरण पुढे आलं. त्यातल्या एका महिलेने तत्कालीन प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयींना पत्र पाठवून तिच्यावर झालेला अत्याचार स्पष्ट शब्दांत नोंदवलाय. त्या पत्रात म्हणतात - ''लोकांसाठी देवी असलेल्या आम्ही वेश्यांसारख्या जगतोय !''

या पत्राच्याच आधारे राम रहिमला शिक्षा सुनावताना कोर्टाने म्हटलं होतं, ''तुमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या शिष्येवर तुम्ही जनावरासारखे तुटून पडलात. त्यामुळे तुमची शिक्षा कमी करता येणार नाही!'' अत्याचार झालेल्या दोनच महिला समोर आल्या असल्या, तरी प्रत्यक्षात अशा ४० महिला सिरसाच्या आश्रमात असल्याची चर्चा तेव्हा झाली होती. बाबाच्या या अय्याशीसाठी खास ''अंडरग्राऊंड'' घर बनवण्यात आलं होतं. त्याला ''गुफा'' म्हटलं जात असे. या महिलांवर कायम सुरक्षारक्षकांची नजर असे. त्यांचा आत्मविश्वास आणि स्वाभिमान संपावा, अशी त्यांना जाणीवपूर्वक वागणूक दिली जात असे. गुरुमहाराज त्यांचं लग्न ''डेरा''तील एखाद्या शिष्याशी कधी लावून देतात याची वाट बघत त्या कोमेजून जात.

''डेरा'' म्हणजे आश्रम आणि ''सच्चा सौदा'' म्हणजे खरा व्यवहार! त्याचं रूपांतर अव्यवहारात कसं झालं? सिरसा शहर हे हरयाणा राज्याच्या पश्चिम टोकाला आणि पंजाब व राजस्थान या राज्यांना खेटून आहे. तिथे १९४७ च्या भारत-पाक फाळणीनंतर बेपरवाह मस्ताना नावाचा ''फकीर'' बलुचिस्तानमधून पंजाबमार्गे आला होता. त्याला त्याच्या पंजाबी गुरूने सिरसा येथे पाठवलं होतं. तिथे त्याने १९४८ मध्ये ''डेरा सच्चा सौदा''ची स्थापना केली. त्याने ''नामशब्द'' हा ध्यानाचा सोपा मार्ग हजारो लोकांना शिकवला. शीख आणि हिंदू धर्मातल्या पुरोहितशाहीने समाजातल्या दलित आणि कारागीर जातींना दूर लोटलं होतं. त्यांना या भक्ती आणि सुफी परंपरेतून प्रेरणा घेतलेल्या बाबाचा सोपा मार्ग आपलासा वाटला. ह्या बलुचिस्तानी बाबाने १९६० मध्ये देह ठेवण्यापूर्वी ''शाह सतनाम सिंग'' नावाचा आपला वारसदार नेमला होता. बलुची बाबाच्या पश्चात त्याने ''मी मृत्यूनंतर ८ वर्षांनी जन्म घेणार आहे,'' अशी घोषणा केल्याची कहाणी पसरवण्यात आली. ह्या कहाणीमुळे ''डेरा सच्चा सौदा''च्या दोन प्रमुखांनी मिळवलेली पुण्याई मातीला मिळाली.

बलुची बाबाच्या पुनर्जन्माच्या बनावट कहाणीमुळे १९६८मध्ये जन्मलेल्या गुरमीत सिंगला वारसदार नेमणं सोयीचं गेलं. गुरमीत धार्मिक नव्हता. तो बऱ्यापैकी श्रीमंत घरातला, छानछोकीत राहाणारा, एकुलता एक मुलगा होता. त्याचे वडील मगहर सिंग हे गंगानगर जिल्ह्यातल्या गुरुसर मोडिया गावात जमीनदार होते. ते 'डेरा'चे सक्रिय कार्यकर्ते असल्याने त्यांच्या शब्दाला तिथे वजन होतं. त्यांच्याबरोबर गुरमीतही लहानपणापासून 'डेरा'शी जोडलेला होता. तीन मुलांचा बाप असलेला हा फॅशनेबल तरुण 'डेरा'चा वारसदार बनेल, असं कुणाच्या ध्यानीमनीही नव्हतं. ...पृष्ठ क्र. १० वर

## असा समाज साथीच्या आजाराने मरणाच्याच लायकीचा असतो!! ...पृष्ठ क्र. ६ वरुन

मुलभूत गोष्टींपासून लोकांना भरकटवलं आहे. या देशाचे आरोग्य धोरण काय असायला हवे ? या साथीच्या आजाराला नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने कोणते मेजर उपाय ठरवले आहेत? किती पसा या वर खर्च करणार आहे? सरकार यासाठी काय करणारआहे? १६ मार्च ला डॉ. आदर्श प्रताप सिंग या IIMS च्या डॉक्टरने संचालकला पत्र लिहून कोरोनाला सामोरे जाण्यासाठी पुरेशी साधन सामग्री नाही असे लिहून कळवले आहे. मात्र अद्यापपर्यंत यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. हे मुद्धे जनतेने विचारण्याची ही वेळ होती. परंतु जनतेच्या अशा कोणत्याही मुलभूत प्रश्नांना बगल देत ...त्या प्रश्नां बद्धल न बोलताही, या जनतेला मूर्ख बनवता येते. ही फँसिजमची थेअरी पुन्हा एकदा चेक करून पहिली आहे. समोर आणली आहे...!

कोरोनाच्या नावाने संपूर्ण देशाला कुलूप लावून मोदी सरकार लोकसभा आणि राज्यसभेचे अधिवेशन का घेत आहे? याकडे ही तेवढेच गांभीर्याने बघितले पाहिजे. काल

राज्यसभेत ''समाजवाद''आणि ''धर्मनिरपेक्ष'' हे दोन शब्द भारतीय राज्यघटनेतून काढण्यासाठी खासदार आणि RSSचे प्रसारक राकेश सिन्हा खासगी विधेयक सभापतिकडे मांडले आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विधेयक मांडण्याच्या बाजूने असतील. असं 'द इंडियन एक्सप्रेस' या वृत्तपत्राची बातमी आहे.

आणि दुसरं म्हणजे कर्फ्यू जनतेला सेलीब्रेट करायला लावला आहे. म्हणजे उद्या जर आणिबाणीसदृश परिस्थिती आणून कर्फ्यू लावला तर, त्यालाही जनतेचं समर्थन मिळवता येईल.!!

म्हणून सामूहिक मुर्खपणाच्या अशा ''व्हायरसने'' सगळ्या माणुसपणालाच आणि पुढच्या भविष्यभिमुख पिढीलाच बाधित करणारा हा समाज, या साथीच्या आजाराने मरण्याच्याच लायकीचा असतो.

# लोकशाही भारत-राष्ट्र की, सनातनी हिंदुराष्ट्र? पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने...

'आनंदा होवाळ' यांच्यासारख्या चळवळीतल्या कार्यकर्त्याच्या पुस्तकाची प्रस्तावना प्रस्तुत करताना, आज मला विशेष आनंद होत आहे, किंबहुना त्याहीपेक्षा जास्त, मला आनंदाजींचा अभिमान वाटतोय. नावातच 'आनंद' असणारा हा माणूस, बाह्यरुपाने अगदी साधा-सरळ दिसत असला तरी, अंतरंगात अगदी पूर्णतया असामान्य कर्तृत्त्वाचा व गुणवत्तेचा 'असामी' आहे आणि महत्त्वाचं म्हणजे, हा गृहस्थ मोठा 'व्यासंगी व विचारसंग्रही' आहे, हे त्यांच्याशी बोलताना सहजी लक्षात येतं. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर अगाध-अपार श्रद्धा असणारे, आंबेडकरी-विचारधारा आणि तत्त्वज्ञान कोळून प्यायलेले 'आनंदा होवाळ' म्हणजे, एक संयमी व्यक्तिमत्व आहे; पण, याचा अर्थ ते 'मवाळ' आहे, असं मात्र नव्हेच! त्यांचा आणि माझा परिचय गेल्या अनेक वर्षांपासूनचाच...त्यांच्या 'इंडियन सोशल मूव्हमेंट' या संघटनेच्या माध्यमातून आम्ही सामाजिक व वैचारिकदृष्ट्या एका विचारपीठावर आलो. 'धर्मराज्य पक्षा'चा अध्यक्ष म्हणून, एक-दीड तपाचा काळ व कामगार-नेता या नात्याने, गेल्या तीन-चार दशकाहून अधिक, असा माझा सत्य-न्याय-बंधुता-समता-ममता असा 'नितीधर्म' लढा...प्रस्थापित धनदांडग्या-भांडवली-व्यवस्थेविरोधातलाच (Vampire-State System) राहिलेला आहे. कामगार-शेतकरी आणि कष्टकरीवर्गाला गुलाम बनवणारी, रक्तपिपासू शोषक-व्यवस्था, जिला आम्ही Vampire State System म्हणतो, त्या व्यवस्थेविरोधात आम्ही जो काही धर्मयुद्धाच्या रुपाने 'एल्गार' पुकारलाय, त्याच पठडीतले आनंदा होवाळ होत. त्यांची जातीअंताची लढाई; तसेच, सामाजिक कर्तव्यभावनेतून तळागाळातील, कष्टकरीवर्गातील दिनदलित जनतेसाठी त्यांचा सुरु असलेला संघर्ष व त्या दरम्यानची त्यांची असीम तळमळ आम्ही पहात आलोय. आनंदाजींच्या चालण्याबोलण्यातून, त्यांच्या पेहरावातून, सोज्वळ वर्तणुकीतून, वरकरणी हा माणूस सरळमार्गी वाटतो, अर्थात तो आहेच; परंतु, त्यांचं लिखाण मात्र, नक्कीच मुळमुळीत नाही...गुळमुळीत तर अजिबातच नव्हे; हे त्यांच्या लोकशाही भारत-राष्ट्र की, सनातनी हिंदुराष्ट्र? या पुस्तकावरुन लक्षात येतंय. एखादे महामार्गावरील वाहन, सुरुवातीला ज्याप्रमाणे महामार्गावरील परिस्थितीनुरुप गती पकडतं...अगदी तसाच 'लेखनप्रवास', त्यांनी या पुस्तकाद्वारे आपल्या जीवनमार्गावरुन बेतलाय. भाजप आणि आरएसएस या दोन्ही धर्मांध संघटनांविरोधात मत व्यक्त करताना, आनंदाजींनी आपली भाषा अधिक आक्रमक ठेवलीय, जी आम्हाला अपेक्षित होतीच. या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांना आवर्जून सांगावसं वाटतं की, राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त, ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात, गांधीहत्या आणि आपण... या विषयावर ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. विवेक कोरडे आणि डाव्या चळवळीतील विद्रोही नेते कॉ. आनंद तेलतुंबडे, या प्रभावी वक्त्यांचे भाषण, आमच्या 'धर्मराज्य पक्ष' आणि ठाणे-काँग्रेसच्या विद्यमाने आयोजित



करण्यात आले होते. या कार्यक्रमाला 'आनंदा होवाळ' जातीने उपस्थित होते. आंबेडकरी-विचारवंत या नात्याने, ते मंचावर विराजमानही झाले होते, तो त्यांचा मानच होता. दि. ३० जानेवारी-२०२६ रोजीच्या या कार्यक्रमानंतर, अवघ्या काही दिवसांतच आनंदाजींचं हे पुस्तक प्रकाशित होतय आणि त्यानिमित्ताने, त्याची प्रस्तावना माझ्याकरवी प्रसवली जातेय, यापेक्षा माझ्यासाठी दुसरा सन्मान तो कोणता? आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून आनंदा होवाळांनी, सनातन्यांवर जो काही 'मूले कुठारः' असा शब्दप्रहार केलाय, तो पुस्तकाच्या शीर्षकातून अधोरेखित होऊ पहातोय. 'गांधीहत्या' हा देशाला लागलेला कधि न मिटणारा असा फार मोठा 'कलंक' होता, जो एका नराधम-माथेफिरु नथुराम गोडसेमुळे भारतभुमीला लागलाय. महात्मा गांधी कधिही, देशाची फाळणी व्हावी...या मताचे नव्हतेच; उलटपक्षी देशाच्या विभाजनाला त्यांचा तीव्र विरोध व अखंडतेसाठी प्रसंगी 'प्राणार्पण' करण्याची त्यांची तयारी होती. 'RSS'ने कसा भारतीय 'राष्ट्रध्वज' (तिरंगा) मनोमन कधिही स्विकारला नाही आणि त्यांचाच 'द्विराष्ट्रवादा'च्या सिद्धांताला कसा पाठिंबा होता, हे 'आनंदा होवाळ' यांनी ज्यापद्धतीने सप्रमाण पटवून दिलंय, त्यावरुन तथाकथित हिंदुत्ववाद्यांची मोठी गोची होऊन त्यांची 'गोबेल्स-निती' वाचकांपुढती उघडी पडल्याशिवाय राहणार नाही. समाधानाची बाब म्हणजे, आनंदाजींनी आपल्या पुस्तकातून फक्त, सनातनी प्रवृत्तीवरच नव्हे; तर, तत्कालीन कट्टरतावादी मुस्लिम नेत्यांवरदेखील आसूड ओढलेत. त्यात त्यांनी विनायक दामोदर सावरकरांसोबतच, मौलाना अबुल कलाम आझाद यांनाही सोडलेले नाही. देशातील हिंदू आणि मुस्लिमांमधील धार्मिक कट्टरता विषद करताना, ते पूर्णतया निःपक्षपाती रहातात, ही त्यांच्या लिखाणाची असाधारण अशी जमेची बाजू. भारतीय संविधान व लोकशाही, यावर नितांत श्रद्धा असणारा आनंदा होवाळांसारखा माणूस, दुर्दैवाने कालौघात काहीसा मागे पडला असला; तरी, या पुस्तकाच्या माध्यमातून, त्यांची नवी ओळख (नयी परख) समाजाला होईल आणि समाज त्याची यथार्थ दखल घेईल, याबाबत माझ्या मनात बिलकूल संदेह नाही. बुद्धाच्या तत्त्वज्ञानावर चालणारा व बुद्धाचं तत्त्वज्ञान जगणारा, हा अवलिया; म्हणजे, खराखुरा आंबेडकरवादी 'सम्यकमार्गी' आहे, ज्याच्या व्यक्तित्वात, 'राजकीय-सौदेबाजी'चा लवलेशही नाही आणि कधी नव्हता!



**'गांधीहत्या' हा देशाला लागलेला कधि न मिटणारा असा फार मोठा 'कलंक' होता, जो एका नराधम-माथेफिरु नथुराम गोडसेमुळे भारतभुमीला लागलाय. महात्मा गांधी कधिही, देशाची फाळणी व्हावी...या मताचे नव्हतेच; उलटपक्षी देशाच्या विभाजनाला त्यांचा तीव्र विरोध व अखंडतेसाठी प्रसंगी 'प्राणार्पण' करण्याची त्यांची तयारी होती. 'ठडड'ने कसा भारतीय 'राष्ट्रध्वज' (तिरंगा) मनोमन कधिही स्विकारला नाही आणि त्यांचाच 'द्विराष्ट्रवादा'च्या सिद्धांताला कसा पाठिंबा होता, हे 'आनंदा होवाळ' यांनी ज्यापद्धतीने सप्रमाण पटवून दिलंय, त्यावरुन तथाकथित हिंदुत्ववाद्यांची मोठी गोची होऊन त्यांची 'गोबेल्स-निती' वाचकांपुढती उघडी पडल्याशिवाय राहणार नाही.**

गांधीजींचं क्षणभर सोडा; पण, भगतसिंगांसाठी संघाने स्वतः काय केले? किंवा डॉ. हेडगेवार, गांधीजींच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेऊन तुरुंगात गेले नव्हते; तर, स्वार्थी हेतूसाठी कसे गेले होते, ते ही संघाचा 'पर्दाफाश' करताना आनंदाजी

प्रभावीपणे विषद करतात...तसेच, काँग्रेस-कार्यकारिणीला 'दुहेरी-सभासदत्वा'ची पद्धत, ही प्रामुख्याने रा. स्व. संघ आणि हिंदू महासभेमुळे कशी बंद करावी लागली; याचंही सखोल विवेचन पुस्तकात येतं. संघ ब्रिटीशांच्या धाकात असल्यानेच गोळवलकरांना ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करणं मान्य नव्हतं, ही त्यांची सप्रमाण मांडणी, इतिहासाच्या पानांआड दडलेलं, एक ऐतिहासिक सत्य पुनश्च चव्हाट्यावर आणतं. ब्रिटीशांनी आपल्याला गुलामीत ठेवणं, हे 'मोठा मासा, छोट्या माशाला खाणार' निसर्ग-नियमानुसार होतं (थोडक्यात, ज्या ब्राह्मणी-वर्णवर्चस्ववादी प्रवृत्ती, आमच्या बहुजन पिढ्यापिढ्यांना अस्पृश्यतेच्या व अन्य प्रकारच्या गुलामीत ठेवत होत्या, त्याचंच छुपं समर्थन), अशा 'बळी तो कानपिळी' जंगली-विचारधारेच्या गोळवळकरांना, स्वाभाविकच देशाच्या अवनत अवस्थेसाठी ब्रिटीशांना दोष देणे वा त्यांच्याविरुद्ध संघर्ष करणे, मान्यच नव्हतं... अशातऱ्हेची धाडसी मांडणी आनंदाजी ऐतिहासिक दाखले देत करत जातात आणि म्हणूनच, देशासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची 'नालायक देशबांधव' अशी कृतघ्न व संतापजनक विभर्त्सना करणाऱ्या गोळवळकरांच्या RSS-संघटनेविषयी, स्वातंत्र्यसैनिकांचा विश्वासघात करणारी संघटना असा प्रत्ययकारी उल्लेख ते करतात. हिंदुधर्माच्या प्राचीन-उज्वल परंपरांचा फुकाचा उल्लेख करायचा आणि देशासाठी प्राणार्पण करण्यासाठी सिद्ध झालेल्या लढवय्या स्वातंत्र्य-सैनिकांचा घोर उपमर्द करायचा... असा हा दुहेरी अवसानघात असल्याचा, आनंदाजी, 'लेझर-बीम' सोडतात. स्वतः हेडगेवार, नेताजी सुभाषचंद्रांना भेटण्यासंदर्भात कशी 'अवमानकारक अनास्था' दाखवतात, त्याबद्दलही अभ्यासपूर्ण मांडणी या पुस्तकात आहे...आणि, ती यासाठी महत्त्वपूर्ण आहे; कारण, सध्या संघियांना त्यांच्या निहीत राजकीय-स्वार्थापोटी नेताजींचा, अगदी 'वल्लभभाई पटेल-पॅटर्न'प्रमाणे, मोठा उमाळा आलेला दिसतोय, म्हणूनच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, वि. दा. सावरकरांच्या एकाच संविधानाखाली एक प्रमुख-प्रबळ हिंदुराष्ट्र आणि दुसरं दुय्यम मुस्लिम राष्ट्र, अशा अतार्किक व अव्यवहार्य राजकीय-मांडणीची, 'ऑस्ट्रिया व तुर्कस्तान' यांच्या तत्कालीन स्थितीचं वर्णन करत, कशाप्रकारे चिरफाड केली...याबद्दलही, या पुस्तकातून आनंदाजी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचं, असं प्रतिपादन करतात. जिना व सावरकरांच्या द्विराष्ट्र-सिद्धांतावर मर्माघाती प्रहार करण्याकामी...राष्ट्रवादाची, धर्म-जात-वंश-पंथ-भाषा व संस्कृती, यांच्या बेड्या व मर्यादा ओलांडणारी परस्परावलंबी, भेदभावरहित सामुदायिक भावना अशा बाबासाहेबांच्या मांडणीचं, आनंदाजी पुनर्जागरण करतात. एक राष्ट्र, एक लोक, एक संस्कृती, ही व्याख्या, नराक्षस डॉल्फ हिटलरच्या एक जनसमूह, एक राज्य, एक नेता, या नाझी-घोषवाक्याशी साधर्म्य सांगते, असा आनंदाजी दावा करतात. तसेच, जाती, या राष्ट्रवादाच्या मार्गातील अडथळ ठरत नाहीत, या सनातनवाद्यांच्या व इतर राजकारण्यांच्या कथनावर, बाबासाहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत, केवळ, भौगोलिक-एकता, राष्ट्र उभारणीसाठी पुरेशी नाही, असं ठामपणे नमूद करत आनंदाजी, RSS-विखारधारेवर (विचारधारेवर नव्हे) या पुस्तकात प्रहार करताना दिसतात. यासंदर्भात पुढे जाऊन हिंदुराष्ट्र अस्तित्वात आल्यास, ते या देशासाठी फार मोठं संकट असेल, या बाबासाहेबांच्या भविष्यवाणीचाही पुनरुच्चार करतात. हिंदुधर्म, हा धर्मातरितांना पुनरपी सामावून घेणारा 'मिशनरी धर्म' का बनू शकत नाही,





याचंही मूळ, देशातील दाहक व तिरस्करणीय अशा, जात-वास्तवात अडकलं असल्याची मांडणी पुस्तकात आहे. गांधीहत्येपश्चात 'RSS'वर बंदी घालणाऱ्या गृहमंत्री वल्लभभाई पटेलांनी, पुढे बंदी उठवताना, राष्ट्रध्वजाचा सन्मान 'RSS'ने राखण्याच्या हमीसोबतच, पटेलांनी त्यांना घालून दिलेल्या पूर्वअटींचंही 'RSS'ने धड कधि कसं पालन केलं नाही, त्या 'RSS'च्या दुटप्पी व विश्वासघातकी वर्तनाकडे आनंदाजी आपलं लक्ष वेधतात. लवचिकतेसह जन्माने प्राप्त होणारी 'चातुर्वर्ण्य-व्यवस्था' उचित म्हणणारे गोळवळकर आणि श्रमांची विभागणी मान्य आहे; मात्र, श्रमिकांची नाही, अशी उद्घोषणा करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर...यांच्यातील मानवतेच्या दृष्टीकोनातून पराकोटीचा तारतम्यभाव, वाचकांनी या पुस्तकाच्या आधारे जरुर पडताळून पहावा, ही वाचकांना नम्र विनंती! स्वातंत्र्यापश्चात, 'तीनचा आकडा, म्हणे अशुभ आहे; म्हणून हिंदू, 'तिरंगा' कधिही मान्य करणार नाहीत', असं 'RSS'चं तमाम हिंदुंची दिशाभूल करु पहाणारं प्रतिपादन होतं...जे तद्दन मूर्खपणाचं, द्वेषमूलक व अज्ञानमय, यासाठी ठरावं; कारण, मुळात 'तिरंगा' हा 'तिरंगा' नसून, तो 'चौरंगा' आहे ('गडद निळ्या' वर्णाचं अशोकचक्र, ते सोयिस्करपणे विसरले)...शिवाय, संपूर्ण भारतीय अध्यात्म व आधुनिक विज्ञान, हे केवळ 'तीन', या संख्येवरच आधारलेलं आहे. उदा. गीतेनुसार 'सत्त्व, रज, तम' अशी त्रिगुणात्मक सृष्टीची रचना आणि इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉनसह त्रिस्तरीय आण्विक-संरचना इ. इ. शंभर वर्षांची संघाची वाटचाल आणि स्वातंत्र्यापश्चातची भाजपाची (जनसंघापासून सुरुवात करत) वाटचाल; ते थेट मालेगाव, मडगाव (गोवा) बॉम्बस्फोट...यावरही आनंदाजी, पावसाळी विजेच्या कल्लोळासारखा आपल्या पापण्या भेदून आत शिरणारा, असा झगझगीत प्रकाश टाकतात. 'RSS'चे प्रेरणास्त्रोत असलेल्या डॉ. मुंजेंनी इटलीचा नृशंस हुकूमशहा (हिटलरचा कडवा साथीदार) बेनिटो मुसोलिनी याच्या घेतलेल्या भेटीनंतरच, त्यांना सैनिकी-शाळा काढायची प्रेरणा मिळाल्याचं आनंदाजी सांगतात. ब्रिटीशांनी शिक्षण व नोकऱ्यांचे दरवाजे बहुजनांसह सर्वांना खुले केल्याने, 'RSS'वाले नाराज होतेच; पण, त्यांची ब्रिटीशासमोर बोलण्याची टाप नव्हती...मात्र, जेव्हा म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली राजकारणात महिला व बहुजनांचा मोठ्याप्रमाणावर शिरकाव झाला; तेव्हा मात्र, आपल्या पायाखालची जमीनच सरकायला लागली... म्हणून, 'RSS'वाल्यांची माथी भडकली, असं आवर्जून आनंदाजी नमूद करतात. पुस्तकाच्या पानापानातून आधुनिक भारताचा पाया घालणारे, बेलगाम खाजगीकरणाला लगाम घालून रक्तपिपासू-निर्मम-शोषक 'भांडवली-व्यवस्थे'वर प्रभावी अंकुश ठेवणारे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणित 'हिंदू कोड बिला'चे जोरदार समर्थन करणारे व भारताला धर्मनिरपेक्ष-समाजवादी राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर मोठी मानमान्यता मिळवून देणारे भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्यासारख्या भारताला लाभलेल्या अमोघ 'नररत्ना'चा...भाजप-संघीय लोक एवढा का तिरस्कार करत आलेत व आजही करताहेत; त्याच्याही यथास्थित उलगडा होत जातो! धर्माचा धंदा आणि धंद्याचा धर्म करणारे भाजप-संघीय लोक, खाजगी-भांडवलाला मोकाट सोडू देऊ इच्छितात... हे आनंदाजी यांचं एखाद्या प्रेषितासारखं विधान, दाहक 'वस्तुस्थिती' (Crony-Capitalism and Uncontrolled 'Privatisation') बनून, आज आपल्यापुढे 'दत्त' म्हणत उभी ठाकलीय, हे विशेषच! मनुस्मृतीने 'माणूस' कधिच केंद्रस्थानी मानला नाही किंवा हिंदू कायदे, हे समष्टीसाठी नव्हते; तर, विशिष्ट वर्गासाठी-जमातीसाठी होते, याचंही पुस्तकात रहस्योद्घाटन होत जातं. त्या हिंदी आणि उर्दुतला फरक मांडताना, वो ख्वाब देखते है, हम देखते है सपना असा मार्मिक उल्लेख ते करतात आणि 'राज्य घटनाकार' व 'हिंदू कोड बिल' निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा अत्यंत गौरवपूर्ण उल्लेख करताना, येणारा भविष्यकाळ हा मनूचा काळ बनून व सर्वसामान्य जनतेचा 'काळ' म्हणून अंगावर येत आहे, असा या 'पुस्तकीय विचार-संहिते'च्या अंती, आनंदाजी अतिगंभीर इशारा देऊन जातात!

...विचारविश्वात, 'एक मैलाचा दगड' बनण्याची अंगभूत क्षमता असणाऱ्या पुस्तकास व त्यांच्या पुढील राजकीय-वाटचालीस, व्यक्तिशः माझ्या आणि माझ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या अनेकोत्तम शुभेच्छा!

**जय महाराष्ट्र, जय हिंद**

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# सत्ता-सेक्स-संपत्तीचा सौदाबाज सत्संग

...पृष्ठ क्र. ७ वरून

पण सतनाम सिंग यांनी, १९९० मध्ये मोठ्या सत्संगाचं आयोजन करून वारसदार म्हणून गुरमीतच्या नावाची घोषणा केली. यामुळे गुरमीत सिंगचा तो ''श्री हुजूर महाराज संत गुरमीत राम रहीम सिंगजी'' झाला. (जसा जगदीश सुर्वे याचा नरेंद्र महाराज झाला.) ह्या ओळखीला पुढे त्याने ''इन्सान'' हे शेपूट लावलं. त्यानंतर एका विदेशी युनिव्हर्सिटीकडून ''मानद डॉक्टरेट''ची पदवी मिळवून तो आपल्या नावापुढे ''डॉक्टर'' पदवीचा टिळा लावू लागला.

गुरमीत याच्या 'डेरा'चा वारसदार म्हणून निवडीमध्ये गुरमीत याचा मित्र गुर्जन सिंगचा हात होता. काकाचा खून करून तुरुंगात गेलेला हा गुर्जन तुरुंगातून बाहेर आला आणि खलिस्तानी अतिरेकी बनला. त्याच्या पिस्तुलाच्या दहशतीने गुरमीत वारसदार बनला. अर्थात, याचे पुरावे कुणाकडेही नसले, तरी गुरमीतचे पुढील काळातले उत्पात पाहता वेगळे पुरावे देण्याची गरज उरत नाही. गुरमीतच्या निवडीत त्याची ''जात'' हीदेखील महत्त्वाचा घटक ठरली. गुरमीत हा उच्च मानल्या गेलेल्या जाट शिखांमधल्या ''सिद्धू'' ह्या पोटजातीतला आहे. मात्र, ''डेरा सच्चा सौदा''चे बहुसंख्य अनुयायी हे 'जाट' आणि 'खत्री' या उच्च जातींमधील शिखांनी केलेल्या भेदभावामुळे दुखावलेल्या दलित आणि ओबीसी समाजातील होते आणि आहेत. मात्र, त्यांच्यामधील पर्यायांना डावलून ''खत्री'' असणाऱ्या सतनाम सिंग यांनी ''जाट'' गुरमीत याला वारसदार निवडलं.

हिंदू धर्मीयांमधील जाती भेदभावाला कंटाळून पंजाबातल्या दलितांनी समतेचं तत्त्वज्ञान सांगणारा शीख धर्म स्वीकारला. पण तिथेही त्यांची निराशा झाली. कारण शीख धर्मात वर्चस्व असणाऱ्या जाट आणि खत्री शिखांनी दलितांना आपल्या बरोबरीचं मानलंच नाही. त्यामुळे शीख आणि हिंदू दोन्ही धर्मांतल्या दलितांना ''डेरा'' आपले वाटले. त्यांची संख्या पंजाबात ३२ टक्के आणि हरयाणात १९ टक्के आहे. ''डेरा सच्चा सौदा'' असलेल्या सिरसामध्ये हे प्रमाण सर्वाधिक २६.६ टक्के आहे. आता हा वर्ग बऱ्यापैकी विदेशात नोकरीधंद्यात स्थिरावल्यामुळे आर्थिकदृष्ट्याही संपन्न झालाय. तथापि, सांस्कृतिकदृष्ट्याही त्यांच्या परंपरा समृद्ध असूनही, सामाजिक मान्यता मिळत नसल्यामुळे त्यांनी 'डेरा'च्या माध्यमातून आपले सामाजिक आणि राजकीय दबावगट निर्माण केलेत. (हे वास्तव समजून घेतल्यावर, राम रहीमची पॅरोलवर सुटका निवडणुकीच्या काळातच का होते, असा प्रश्न पडणार नाही.)

गुरमीत जेव्हा ''डेरा''चा प्रमुख म्हणजे ''डेरामुखी'' झाला; तो १९९० चा काळही त्याच्या भरभराटीसाठी अनुकूल ठरला. या काळात जागतिकीकरणामुळे समाजात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आली होती आणि ''मंडल आयोग''च्या अंमलबजावणीमुळे सामाजिक सन्मानाचं भानही आलं होतं. हरयाणा-पंजाबमध्ये असे शेकड्याने 'डेरे' असले तरी बाबा राम रहीमसारखा त्याचा फायदा कुणीच करून घेतला नाही. 'डेरा'ची सत्ता हातात येताच राम रहीमने स्वतःच प्रभाव वाढवण्यासाठी सर्व प्रकारचे हातखंडे आजमावायला सुरुवात केली. 'डेरा'च्या साहित्यामधून राम रहिम विषयी चमत्काराच्या घटना प्रकाशित होऊ लागल्या. त्याचं सर्वसामान्य पूर्वायुष्यही चमत्काराच्या कथांनी फुलवण्यात आलं. त्याच्या स्पर्शाने कॅन्सर कसा बरा झाला. त्याच्या दर्शनाने प्रमोशन कसं मिळालं. नोकरी कशी मिळाली. कर्ज कसं फिटलं. लग्नानंतर २०-२५ वर्षांनी मूल कसं झालं; याच्या सुरस आणि चमत्कारिक अनुभव-कथा 'डेरा'च्या वेबसाइटवर प्रकाशित होऊ लागल्या. तो फक्त ''मेसेंजर ऑफ गॉड'' म्हणजे ''देवदूत'' नाही, तर ''साक्षात देवच'' असल्याचा विश्वास त्याच्या भक्तांमध्ये निर्माण करण्यात आला. (अशाच प्रकारे साईबाबा + दत्त + विष्णू अवतार बनलेल्या अनिरुद्ध जोशी तथा बापूने ''आपण देव नसल्याची कबुली देणारी याचिका'' अलिकडेच सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे.) ह्या अंधभक्तीतून निर्माण झालेल्या हिंसकतेचे प्रदर्शन शिष्येच्या केसमध्ये पंचफुला कोर्टाने राम रहीमला १० वर्षांची सक्तमजुरीची सजा सुनावल्यानंतर घडले. ऑगस्ट २०१७ मध्ये कोर्टात आरोपीच्या पिंजऱ्यात उभा असलेला राम रहीम न्यायाधीशांना हात जोडून मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार यांची कारणं सांगत सजा कमी करण्याची भीक मागत होता आणि त्याला देव मानणारे दीड लाख अंधभक्त न्यायाधीशांवर दबाव आणण्यासाठी कोर्टाबाहेर जमले होते. त्यांना आवरण्यासाठी हरयाणातील ''भाजप सरकार''ला (मुख्यमंत्री मनहरलाल खट्टर) लष्कर बोलवावे लागले. न्यायमूर्तींनी आपला निकाल जाहीर करताच, बाबाच्या बॉडीगार्डने कोर्टातच राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या मुस्कटात भडकावली. तर कोर्टाबाहेर राम रहिमच्या अंधभक्तांनी पिशव्या-झोळ्यांमधून आणले दगड आणि हत्यारे बाहेर काढून ती बंदोबस्तासाठी असणाऱ्या जवानांवर उगारली. दुकाने आणि रस्त्यावरची खाजगी वाहने जाळली. रेल्वे, पोस्ट ऑफिस अशा सरकारी इमारतींवर हल्ला केला. ह्या हिंसाचारात ३८ लोक मृत्युमुखी पडले आणि २७० जखमी झाले.

'डेरा'चा प्रमुख बनल्यानंतर केवळ नऊ वर्षांत राम रहीम निर्ढावलेला बलात्कारी बनला. यावरून त्याचं अधःपतन किती वेगाने झालं याचा अंदाज येऊ शकतो. अनिर्बंध सत्तेमुळे त्याने एकामागून एक खूनही केले आणि पचवले. बाबाने केलेले अत्याचार उघड करणाऱ्या शिष्येचा भाऊ राजिंदर सिंग याचा खून १० जून-२००३ ला झाला. त्याआधी शिष्येचं पत्र छापणारे ''पूरा सच''चे संपादक रामचंद्र छत्रपती यांचा खून घडवला होता. त्या पाठोपाठ ''डेरा''चा माजी मॅनेजर फकीर चंद गायब झाला. याशिवाय, त्याच्या ४०० शिष्यांना नपुंसक बनवण्याचा भयंकर आरोप राम रहीमवर होता. 'डेरा'मध्ये शिष्य म्हणून राहिलेले हंसराज चौहान यांनी १७ जुलै २०१२ रोजी हायकोर्टात याचिका दाखल करून राम रहीमवर हा आरोप केला होता. त्याने केलेल्या याचिकेमध्ये नमूद केले की, ''राम रहीमच्या आदेशानुसार 'डेरा'तील डॉक्टरांची टीम वेदनादायी ऑपरेशन करून शिष्यांना नपुंसक बनवत असे. त्यामुळे देवाचे दर्शन होईल, असं त्यांना सांगितलं जात असे.'' ह्या नपुंसक पहारेकऱ्यांच्या बंदोबस्तात राम रहीमशी शारीरिक संबंध असलेल्या महिला शिष्यांना ठेवण्यात येत असे, ह्याची नोंद ह्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या ''सीबीआय''च्या अहवालात आहे. १९९९ ते २०१९ ह्या एकत्रित घटनाक्रमाचा आढावा घेऊन ''विशेष सीबीआय न्यायालय''ने राम राम रहीमला संपादक रामचंद्र छत्रपती यांच्या खून प्रकरणात १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली होती. त्यासाठी योग्य ठरलेले पुरावे पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयात निकामी कसे ठरतात? निकाल का फिरतात? हा नामाचा नाही, तर कामाचा महिमा आहे.

बाबा राम रहीम हे नाव तब्बल २२ वेळा 'गिनीज बुका'त नोंदवलं गेलंय. विशेष म्हणजे, यातला एकही विक्रम त्याने स्वतः केलेला नाही. त्याच्या संस्थेने आणि अनुयायांनी हे विक्रम केलेत. २००३ मध्ये सर्वात मोठं रक्तदान शिबीर आयोजित करण्याचा विक्रम ''डेरा''ने केला. तो त्यांनीच तीन वेळा मोडला. अशाच प्रकारे सर्वाधिक वृक्षारोपणाचा विक्रम तीनदा केलाय. याशिवाय डायबेटिस, ब्लडप्रेशर, कॉलेस्टेरॉल, सोनोग्राफी, डोळे तपासणी अशा आरोग्यविषयक तपासणींची सर्वात मोठी शिबिरं आयोजित करण्याचेही विक्रम राम रहिमच्या नावावर आहेत. ह्यात सर्वाधिक लोकांनी एकत्र येऊन हात धुण्याचाही अनोखा विक्रम आहे. शिवाय, लोकांनी एकत्र येऊन सर्वात मोठी आकृती तयार करणं, कधी भाज्यांनी सर्वात मोठं चित्र बनवणं, बोटांच्या ठशांचं सर्वात मोठं चित्र बनवणं असेही काही विक्रम आहेत. बाबाच्या वाढदिवसानिमित्त सर्वात मोठं ग्रीटिंग कार्ड, सर्वात मोठं पोस्टर, सर्वाधिक दिवे पेटवणं, शुभेच्छा देणारे सर्वाधिक व्हिडियो शेअर करणं, असे विक्रम गेले काही वर्ष सुरू आहेत. बाबाला शिक्षा होण्याच्या काही दिवस आधी बाबाच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या शिष्यांनी एकाच केकवर दीड लाख मेणबत्त्या पेटवून नवा विश्वविक्रम केला होता. आपल्याकडे हेच उद्योग पांडुरंगशास्त्री आठवले, नानासाहेब धर्माधिकारी, अनिरुद्ध बापू, नरेंद्र महाराज, स्वामी समर्थ आदींची भक्त मंडळी करीत असतात. त्यांची मतं मिळावी, म्हणून राजकारणी अशा उपक्रमाला मदत करीत बुवा- बापूंना डोक्यावर बसवतात. (ही महायुती भलतीच व्यापक आहे.) यामुळेच २०१४ च्या लोकसभा निवडणूक प्रचाराच्या हरियाणा-पंजाबमधील सभांमध्ये प्रधानमंत्रीपदाचे उमेदवार असलेल्या नरेंद्र मोदी यांना पंजाब - हरयाणातील ४० विधानसभा मतदारसंघांवर प्रभाव असलेल्या बाबा राम रहीम याचा गौरव करावा लागला होता. बाबानेही 'भाजप'च्या सोयीसाठी प्रखर राष्ट्रवादाची भूमिका घेतली होती.

२०१७ ते २०२५ दरम्यान लोकसभेच्या आणि पंजाब-हरयाणा विधानसभेच्या प्रत्येकी दोन-दोन निवडणुका झाल्या. जवळपास प्रत्येक निवडणुकीच्या काळात बाबा राम रहीम पॅरोल / फर्लो रजेवर रोहतक तुरुंगातून बाहेर आला आहे. यातील ६ वेळा त्याची रजा रोहतक कारागृहाचे तेव्हाचे तुरुंग अधीक्षक सुनील सांगवान यांनी मंजूर केली होती. त्यांना २०२४ च्या हरयाणा विधानसभा निवडणुकीत ''भाजप''तर्फे उमेदवारी मिळावी, हा योगायोग नाही. ह्यात योजकता आहेच. अशाच प्रकारे ''भाजप''च्या रामराज्यात ''कोरोना-लॉगडाउन''सारख्या जीवघेण्या संकटात, न्यायालयात बोगस ठरलेल्या ''कोरोनिल'' औषधाचा ४००० कोटी रुपयांचा धंदा करणारा रामदेवबाबा मोकाट राहतो! एप्स्टीनसारखे भयानक हे लोक आहेत. तरीही राम रहीम पाठोपाठ लवकरच लोकशाहीला ''रामनाम सत्य है'' या घोषात खांदा देण्यासाठी आसाराम, रामपाल, रामवृक्ष यादव यांचीही निर्दोष मुक्तता होईल! रामनामाचा महिमा असाही आहे. जय श्रीराम!!

*(प्रसिद्धी : दै. देशोन्नती, रवि. १५ मार्च २०२६)*

# इस्त्रायल, अमेरिका, इराण... जो जे वांछील तो ते लाहो!



इराण आणि अमेरिका-इस्त्रायल, यांच्यात जुंपलीय. इस्त्रायल-अमेरिका इराणला खतम करायला निघालेत. इराण जाम चिवट आहे, मरेल पण इतरांना छळेल. अमेरिकेनं जगाला टॅरिफ लादून जगाला वेठीस धरलं, इराण होरमुझची सामुद्रधुनी अडवून जगाला वेठीस धरतंय...

भारतानं काय करावं? भारताचं राजकीय धोरण काय असावं? भारत आता एका अध्यात्मिक-उन्नतस्थितीत पोहोचला आहे. भारत राळेगणसिद्धीतल्या एका विशाल वृक्षाखाली, एका बाकड्यावर बसला आहे. भारताचे डोळे उघडे आहेत; पण, भारत जागा नाही. भारताचे डोळे कधी मिटलेले असतात... पण, भारत झोपलेला नसतो. भारत कधी चालत असतो पण, त्याला कुठंही जायचं नसतं. भारत कॅमेऱ्याला पोझ देत आकाशाकडं पहात असतो; पण, तो विचार करत नसतो. भारत कधी निवांत बसलेला असतो; पण, तरीही अंतर्मनात तो अनंत योजने चालत असतो...

भारताच्या सीमेच्या अगदी जवळ शत्रूचे रणगाडे पोहोचले होते. सेनापती अस्वस्थ झाले. काही केलं नाही तर, रणगाडे भारतात घुसून नाश करणार. काही केलं तरी, युद्ध सुरु होऊन पुन्हा नाशच होणार... करायचं काय? सेनापतीनं भारताला विचारलं, मी काय करु? भारत म्हणाला, ''वत्सा तुला जे योग्य वाटेल ते कर!'' ...वत्स म्हणजे, सेनापती विचारतो ''सर, मी तुम्हाला गेले कित्येक तास विचारतोय, तुमचं आपलं हेच उत्तर आहे. मी काहीही केलं नाही तर?'' भारताचं 'भरतवाक्य' होतं, 'वत्सा तुला योग्य वाटतं ते कर.'

रशियानं दीड लाख सैन्य युक्रेनच्या सीमेवर उभं केलं. साऱ्या जगाला ते सॅटेलाईट चित्रात दिसलं. भारतालाही ते दिसलं. भारत झाडाखाली निवांत होता. बरेच दिवस झाले, रशियन सैन्याला काही काम नव्हतं. बिच्चारं कंटाळलं होतं. पाय मोकळे करायला युक्रेनच्या हद्दीवर पाठवलं असणार. चांगलंच आहे की... ''रशियन सैन्याला पातंजलीची योगसूत्रं पाठवा'' भारत म्हणाला. रशियानं पातंजली पोहोचायची वाट पाहिली नाही. तोफा डागल्या, ड्रोन सोडले, विमानं बॉम्ब टाकत फिरली, अग्निबाणांचा पाऊस पडला, युक्रेनमधली पोरंबाळं मरू लागली. आकाशात टक लावून बसलेल्या भारताच्या डोक्यावर, वरुन एक कावळा शिटला. तरीही भारत शांत होता, ब्रह्मानंदी टाळी लागली होती.

''रशियाला गीतेच्या प्रती पाठवा, युक्रेनलाही पाठवा. त्यांना माझा निरोप द्या... दोघांनीही बंदुका खाली ठेवाव्यात, गीतेचं पारायण करावं. त्यांना मराठी कळतं की नाही, याची चौकशी करा, येत असल्यास ज्ञानेश्वरी पाठवा. युद्ध थांबेल!'' भारत म्हणाला...

रशियानं भारताचे आभार मानले. रशिया म्हणाला, ''भारतानं योग्य मार्गदर्शन केलं. भारताला शांततेचं पारितोषिक द्यायला हवं.'' भारताच्या गालावर खळी पडली. भारत मंदसं हसला. तीन वर्षे होऊन गेली. युक्रेनचे काही लाख, रशियाचे काही लाख मेले. राजकारणाशी संबंध नसलेले म्हातारे बायकापुरुष मेले, जगणं सुरुही न झालेली मुलं मेली. भारत शांत आहे, ध्यानात मग्न आहे.

भारताच्या कानावर आलं की, गाझानं अमानुष खोडी काढलीय. इस्त्रायलची निष्पाप माणसं मारलीत. माशी कानाशी घोंगावल्यावर जशी वारतात, तशी ही बातमी भारतानं वारली. इस्त्रायलनं बदल्याची कारवाई सुरु केली. गाझाच्या काही तासांच्या उद्योगाला, अनंत महिन्यांचं उत्तर इस्त्रायलनं दिलं. गाझा पार उध्वस्थ केलं. गाझात दररोज दोनशे, अशा दरानं माणसं मरत आहेत. दोन-चार माशा घोंगावल्यासारखं झालं, भारताच्या कपाळावर एक आठी पडली, अनुवटीखाली धरलेला हात काढून, भारतानं त्या माशांना हाकललं... काय या माशा, त्यांना कळत कसं नाही; की, मी ध्यानात आहे...

भारतानं समोर पाहिलं, कॅमेरामनला भारताची भाषा कळत होती. कॅमेरा ऑन झाला. भारतानं मागं वळून पाहिलं, एक सेवक पुढं आला. ''गीतेच्या प्रती शिल्लक आहेत ना? पाठवा गाझा आणि इस्त्रायलमधे'' भारतानं सेवकाला सांगितलं. वाक्य संपल्यावर भारत दहा सेकंद थांबला. भारतानं खुणावलं, कॅमेरामननं ट्रायपॉड उचलला, बाजूला सरकला. दुसरा कॅमेरा आला, कॅमेरामननं कॅमेरा सेट करुन भारताला खूण केली. सेवकानं एक मोर आणला, भारतासमोर ठेवला. भारतानं मोराला दाणे घातले. मोर दाणे खाईच ना, त्याला कंटाळा आला होता. गेले काही तास भारत सतत मोराला दाणे भरवत होता, मोराचं पोट भरलं होतं, मोराला अजीर्ण झालं होतं. भारत थांबेना, कॅमेरा थांबेना. शेवटी कंटाळून मोरानं एकदोन दाणे टिपले. भारताच्या चेहऱ्यावर अध्यात्मिक आनंद पसरला, कॅमेऱ्यानं 'तो' क्षण अचूक पकडला... झाड तेच, बाकडं तेच, भारतही तोच. परिस्थिती बदलली होती. इराण युद्ध... समोर मॉनिटर होता. अमेरिकेचे पहाटेचे अडीच वाजले होते, अमेरिकेचे प्रेसिडेंट फ्लोरिडातल्या रिसार्टवर होते. प्रेसिडेंट म्हणाले, ''मी इराणवर हल्ला करायची आज्ञा लष्कराला दिली आहे!'' कॅमेऱ्यापाठी उभा ठाकलेल्या पत्रकारानं कारण विचारलं. काहीशा विस्कटलेल्या प्रेसिडेंटनी एक कारण सांगितलं. टीव्हीचा माणूस कॅमेरा गुंडाळून निघाला. प्रेसिडेंटनं त्याला थांबवलं, एक नवं कारण सांगितलं. कॅमेरामननं रेकॉर्डिंग केलं, निघाला. प्रेसिडेंटनी पुन्हा त्याला बोलावलं, तिसरं कारण. सभोवताली बर्फ पडत असतानाही कॅमेरामनला घाम फुटला. भारत हे सारं समोर ठेवलेल्या मॉनिटरवर पहात होता.

हनुवटीखाली हात. भारताचा छान वेळ चालला होता. मोरांपाठोपाठ पोपट आले, भारतानं पोपटांना पेरु खायला घातले. भारत थकला, मागं उभा असलेला सेवक गोमुत्राचा ग्लास घेऊन आला. भारत विचारात पडला, त्यानं ग्लास घेऊन जा अशी खूण केली. तो सेवक गेला. दुसरा सेवक आला, त्याच्या हातात हळद घातलेलं दूध होतं. भारताच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. मॉनिटरवर इराणवर पडणारे बॉम्ब दिसत होते. भारतानं इस्त्रायलच्या पंतप्रधानांना अभिनंदनाचा संदेश पाठवला. सेवकानं विचारलं की, अमेरिकेच्या प्रेसिडेंटला संदेश पाठवू का? भारत काहीसा गोंधळला. सेवकाच्या कानात भारत म्हणाला, ''संदेश धाडू नका, फोन लावा... तिकडून फोन उचलला की, मी बोलेन!'' अमेरिकन प्रेसिडेंटनी फोन उचलला नाही. भारत ध्यानमग्न होता. सर्व पक्षांना दाणे घालून झाले होते. आता काय? असा प्रश्न सेवकासमोर होता. सेवकानं दबकत दबकत भारताच्या कानाजवळ तोंड नेऊन विचारलं, ''वनतारात नेण्यासाठी एक वाघ आणलाय, सध्या तो आपल्याच पिंजऱ्यात आहे. तसा तो माणसाळलेला आहे, आणू कां?'' तेवढ्यात सेवकानं सेलफोन आणला, भारतासमोर ठेवला. ''सर, होरमुझची खाडी बंद झालीय, तेल येत नाहीये, तेल महागलंय, ढोकळा-फाफडा खाऊ घालणारी रेस्टॉरंटही बंद पडत आहेत... हॉटेलवाले म्हणत आहेत की, सिलिंडरची किमत चौपट झालीय, सिलिंडर मिळत नाहीये, मिळवण्यासाठी पैसे चारावे लागत आहेत, काय करावं?'' भारत शांत होता. भारताचा हात पुन्हा हनुवटीखाली गेला. भारतानं आकाशाकडं पाहिलं. कॅमेरामन सरसावला. भारतानं खुणावलं, कॅमेरा नको म्हणाला. सेवकाला सांगितलं, ''लिहून घ्या... जो जे वांछील तो ते लाहो, प्राणीजात... इस्त्रायलची वांछा, अमेरिकेची वांछा, उध्वस्थ इराणची वांछा, उध्वस्त गाझाची वांछा, उध्वस्त युक्रेनची वांछा. सर्वांच्या वांछ्या पुऱ्या होवोत!'' सेवकानं विचारलं, ''माध्यमांकडं पाठवू?'' भारतानं डोळे किलकिले केले; म्हणाले, ''आपल्या आयटी सेलकडं पाठवा'' सेवक पळाला. भारत पुन्हा ध्यानमग्न झाला !!!

*....निळू दामले*

**हल्ली हिंदुत्ववादी धर्मांध तथाकथित साधुसंत एक तर मुस्लिम द्वेष उगाळत असतात किंवा ब्राह्मणी उदोउदो करत असतात. काही दिवसापूर्वी स्वतःला साधुसंत म्हणवणाऱ्या गोविंद गिरी महाराजाने तुकारामांना कमी लेखत रामदासांना श्रेष्ठ ठरवले. त्याचा चिकित्सक समाचार घेणारा JK चा हा लेख...**

# गोविंद गिरी महाराजाचा भोंदूपणा – जगदीश काबरे

महाराष्ट्राची संतपरंपरा ही केवळ धार्मिक भावनेची परंपरा नसून ती सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक परिवर्तनाची शक्ती आहे. या परंपरेने हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेला आव्हान दिले, जातिभेदावर प्रहार केला आणि सामान्य माणसाला अध्यात्माच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे संतांबद्दल बोलताना केवळ भक्तिभाव किंवा राजकीय हेतू न ठेवता इतिहास, साहित्य आणि सामाजिक संदर्भ यांचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु अलीकडे काही धार्मिक नेते किंवा राजकीय छायेखाली वावरणारे साधू-संत अशा प्रकारची वक्तव्ये करतात की ज्यामुळे संतपरंपरेचे मूळ स्वरूपच विकृत करून दाखवले जाते. गोविंद गिरी महाराज यांनी केलेले 'ज्ञानोबा-तुकोबांहून रामदास स्वामी ग्रंथनिर्मितीत श्रेष्ठ' हे वक्तव्य याच प्रकारात मोडते. त्यांच्या विधानांमध्ये महाराष्ट्रातील संतपरंपरेचा इतिहास, वारकरी संप्रदायाची सामाजिक भूमिका आणि समर्थ रामदासांचे स्थान या सर्वांचा अभ्यास अत्यंत उथळ असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळेच या वक्तव्यांकडे केवळ भावनिक प्रतिक्रिया म्हणून न पाहता त्याचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

**महाराष्ट्रातील संतपरंपरेचा पाया समजून घेतला तर सर्वप्रथम आपल्यासमोर उभे राहतात ते संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, आणि इतर अनेक वारकरी संत. या संतांनी अध्यात्माला मठाच्या भिंतीत कैद न करता तो लोकांच्या जीवनात आणला. त्यांच्या वाङ्मयात देव हा मंदिरातील मूर्तीपुरता मर्यादित नाही; तो शेतात, रानात, श्रमात आणि माणसाच्या अंतःकरणात आहे. वारकरी संप्रदायाने देवापर्यंत पोहोचण्याचा अधिकार सर्वांना दिला.** जात, धर्म, लिंग, आर्थिक स्थिती या कोणत्याही भेदांवर आधारित अडसर त्यांनी नाकारले. त्यामुळेच वारकरी परंपरेला ''अध्यात्मिक लोकशाही'' असे म्हणले अतिशयोक्ती ठरू नये. वारकरी संप्रदायाच्या वारीत हजारो लोक एकत्र चालतात, एकत्र भजन करतात आणि एकत्र भोजनही करतात. समाजातील सर्वात खालच्या थरातील व्यक्तीलासुद्धा या प्रवासात समान स्थान मिळते. संत चोखामेळ्यासारखा अस्पृश्य मानला गेलेला संतसुद्धा या परंपरेचा भाग आहे. त्यांच्या अभंगांमध्ये सामाजिक अन्यायाविषयी तीव्र वेदना व्यक्त होते. वारकरी संतांनी जरी पूर्णपणे जातिअंताची क्रांती घडवली नसली तरी त्यांनी जातीव्यवस्थेच्या नैतिक अधिष्ठानावर प्रहार केला होता. देवाच्या दारात सर्व समान आहेत ही कल्पना त्यांनी समाजाच्या मनात खोलवर रुजवली. त्यामुळे वारकरी परंपरा ही केवळ भक्तीची नव्हे तर सामाजिक समतेची चळवळ ठरते.

याच्या तुलनेत समर्थ रामदास यांची भूमिका थोडी वेगळी होती. रामदास हे नक्कीच प्रतिभावंत कवी, विचारवंत आणि संघटनात्मक क्षमता असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या लेखनात नैतिकता, कर्तव्य, शिस्त, धैर्य आणि समाजरक्षण या संकल्पनांवर भर आहे. परंतु ते वारकरी संप्रदायाचे संत नव्हते हे ऐतिहासिक सत्य आहे. त्यांनी स्वतःचा समर्थ संप्रदाय निर्माण केला आणि मठव्यवस्था उभारण्यावर विशेष भर दिला. त्यांच्या दासबोध आणि मनाचे श्लोक यांसारख्या ग्रंथांमध्ये वैयक्तिक चारित्र्य, शौर्य आणि समाजसंघटन यांचा पुरस्कार आहे. या साहित्यिक योगदानामुळे त्यांचे स्थान निश्चितच महत्त्वाचे आहे, परंतु त्यामुळे ते वारकरी संतांच्या सामाजिक क्रांतीपेक्षा श्रेष्ठ ठरतात असा निष्कर्ष काढणे हे इतिहासाच्या विरुद्ध आहे. समर्थ संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यांच्यातील मूलभूत फरक लक्षात घेतला तर गोष्ट अधिक स्पष्ट होते. वारकरी परंपरा ही लोकचळवळ होती, ती मठकेंद्रित नव्हती. ती पंढरपूरच्या वारीभोवती फिरणारी सामूहिक साधना होती. तर समर्थ संप्रदायात मठसंस्था आणि महंतांची व्यवस्था अधिक मजबूत दिसते. रामदासांनी अनेक ठिकाणी मठ स्थापन केले आणि त्यांच्यामार्फत धार्मिक तसेच सामाजिक संघटन उभारण्याचा प्रयत्न केला. या व्यवस्थेत गुरू-शिष्य परंपरेला महत्त्व होते. त्यामुळेच रामदासांच्या वाङ्मयात महंतांच्या आचारसंहितेचा उल्लेख वारंवार येतो.

रामदासांच्या एका ओवीत ते म्हणतात, ''जैसे बोलणे बोलावे तसेची चालणे चालावे, मग महंतलीला स्वभावे अंगी बाणे.'' या ओवीतून महंतांच्या जीवनातील शिस्त आणि आचरण यावर भर दिलेला दिसतो. म्हणजेच त्यांच्या दृष्टीने समाजपरिवर्तनाची पद्धत ही मठसंस्था आणि संघटन यांवर आधारित होती. ही पद्धत वारकरी परंपरेपेक्षा भिन्न होती. वारकरी संतांनी समाजातील सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले, तर समर्थ परंपरेत गुरू-महंत यांच्या नेतृत्वाखालील संघटन दिसते. इतिहासाचा हा संदर्भ लक्षात घेतला तर गोविंद गिरी महाराज यांनी केलेली तुलना किती चुकीची आहे हे स्पष्ट होते. जर कोणी म्हणत असेल की रामदास हे ज्ञानोबा-तुकारामांपेक्षा श्रेष्ठ होते आणि त्यांचे साहित्य स्वतंत्र आहे, तर हा निष्कर्ष अत्यंत वरवरचा ठरतो. कारण ज्ञानेश्वरांनी केवळ भाष्य केले असे म्हणणे म्हणजे ज्ञानेश्वरीसारख्या प्राकृत भाषेतील म्हणजेच सामान्यांना समजेल या भाषेतील ग्रंथाचा अपमान आहे. ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेचे मराठी भाषांतर किंवा भाष्य केले नाही; त्यांनी तिला नव्या तत्त्वज्ञानात्मक आणि काव्यात्मक उंचीवर नेले. **ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेतील एक तत्त्वज्ञानात्मक काव्यकृती आहे. त्याचप्रमाणे तुकाराम गाथा हा केवळ अभंगांचा संग्रह नाही तर तो महाराष्ट्राच्या सामाजिक मनाचा दस्तऐवज आहे. तुकारामांनी धर्मातील ढोंग, जातिभेद आणि दांभिकतेवर अत्यंत तीव्र प्रहार केले. त्यांच्या अभंगांमध्ये समाजातील अन्यायाविषयी स्पष्ट भूमिका दिसते. त्यामुळे ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या लेखनाला केवळ भाष्य किंवा संकलन म्हणणे म्हणजे त्यांच्या क्रांतिकारी सामाजिक भूमिकेचे अवमूल्यन करणे होय.**

खरं तर संतपरंपरेचे मूल्यांकन करताना ''कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ'' असा प्रश्नच चुकीचा आहे. प्रत्येक संताचे कार्य वेगळ्या संदर्भात महत्त्वाचे असते. ज्ञानेश्वरांनी तत्त्वज्ञान आणि अध्यात्म लोकभाषेत आणले. तुकारामांनी सामाजिक विषमता आणि धार्मिक ढोंगावर प्रहार केला. नामदेवांनी भक्तीचा प्रसार पंजाबपर्यंत केला. रामदासांनी शिस्त, संघटन आणि नैतिकता यांचा पुरस्कार केला. या सर्व संतांचे योगदान वेगवेगळ्या क्षेत्रांत महत्त्वाचे आहे. त्यामुळे एका संताला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ ठरवण्याचा प्रयत्न हा सहसा राजकीय हेतूंनी प्रेरित असतो. आजच्या राजकीय वातावरणात संतपरंपरेचा वापर अनेकदा सत्तेच्या राजकारणासाठी केला जातो. काही लोकांना वाटते की एखाद्या संताला विशिष्ट राजकीय विचारसरणीशी जोडले तर त्यातून समाजावर प्रभाव टाकता येईल. त्यामुळे संतांच्या विचारांचे विकृतीकरण केले जाते. कधी रामदासांना छत्रपती शिवाजींच्या राजकारणाशी अतिशयोक्तीपूर्णरीत्या जोडले जाते, तर कधी वारकरी संतांच्या समतावादी विचारांना कमी लेखले जाते. अशा प्रयत्नांमागे ऐतिहासिक सत्यापेक्षा राजकीय लाभाचा विचार अधिक असतो.

**याच पार्श्वभूमीवर गोविंद गिरी महाराज यांची भूमिका अधिक गंभीर ठरते. कारण ते केवळ धार्मिक व्यक्ती नाहीत; तर ते 'श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्ट' या संस्थेशी संबंधित आहेत. अशा पदावर असलेल्या व्यक्तीकडून अधिक जबाबदार आणि अभ्यासपूर्ण विधानांची अपेक्षा असते. परंतु जेव्हा अशा व्यक्ती संतपरंपरेबद्दल उथळ आणि पक्षपाती मत मांडतात तेव्हा समाजात संभ्रम निर्माण होतो, तसेच त्यांच्या विद्वत्तेबद्दलही संशय निर्माण होतो. संतांविषयी बोलताना नम्रता आणि आत्मपरीक्षण आवश्यक असते. संत तुकाराम म्हणतात, ''संतांचे महिमा तो बहु दुर्गम, शाब्दिकांचे काम नाही येथे.'' या ओळीत एक खोल अर्थ दडलेला आहे. संतांचे महानत्व शब्दांनी किंवा घोषणांनी सिद्ध होत नाही; ते त्यांच्या जीवनातून आणि कार्यातून प्रकट होते. त्यामुळे कोणताही साधू किंवा धार्मिक नेता स्वतःला संतपरंपरेचा निर्णायक समजून इतर संतांचे मूल्यमापन करू लागला तर तो संतांच्या विनम्रतेच्या परंपरेलाच विरोध करतो.**

आजच्या काळात समाजाला खरी गरज आहे ती संतांच्या विचारातील मानवतावाद समजून सांगण्याची. ज्ञानेश्वरांनी ''विश्वचि माझे घर'' ही कल्पना मांडली. तुकारामांनी ''जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले'' असे सांगितले. या ओळींमध्ये मानवी समतेचा आणि करुणेचा संदेश आहे. हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. परंतु जर संतांचा वापर राजकीय प्रचारासाठी केला गेला तर त्यांच्या विचारांची खरी शक्ती नष्ट होते. म्हणूनच गोविंद गिरी महाराजांसारख्या व्यक्तींनी केलेल्या विधानांची चिकित्सक समीक्षा ...पृष्ठ क्र. १४ वर

# फुकटखाऊ राजकारणाचा अंत झालाच पाहिजे, नाही तर...?




चीन मनुष्यबळाच्या जोरावर वेगाने विकसित होऊ शकला, तसा विकास भारताचा होऊ शकला नाही. मात्र, जगात असे अनेक छोटे-मोठे देश आहेत, ज्यांना मनुष्यबळ कमी असतानासुद्धा विकास साधता आला. चीन आर्थिक महासत्ता बनला, आणि अनेक छोटे देश आहेत जे विकासाचा संकल्प अंमलात आणू शकले पण भारतात केवळ आर्थिक विकासाचे काही फुगवटे निर्माण झाले, असे का घडले त्याचे विश्लेषण मी याठिकाणी करीत आहे.

**इंग्लंड, युरोपमध्ये १० महिने सूर्याचे दर्शन होत नाही, त्यामुळे तेथे अन्न धान्य पिकत नाही. स्वित्झर्लंडकडं समुद्र नाही. सिंगापूरमध्ये धान्य पिकत नाही, शेतजमिनींचा अभाव आहे. दुबई-अबुधाबीवगैरे अमिरातीत जंगलं नाहीत, पावसाळा तर जवळपास नाहीच, जपानकडं खनीज संपत्ती नाही, मनुष्य बळ सुद्धा मोजकेच आहे, अणुबॉम्ब पडल्यानंतर लाखो मेले, आणि अपंग झालेले, नेदरलँड्सकडं पर्वत नाही, भारतापेक्षा ४ पट मोठा भुभाग असलेल्या ब्राझीलची लोकसंख्या केवळ ९ कोटी असल्यामुळे शेती करायला माणसेच नाहीत.**

कॅनडा, अमेरिकेत सुद्धा मनुष्य बळाचा तसा अभावच आहे, भारताकडे हे सगळ म्हणजे सगळ आहे, १४० कोटी मनुष्यबळ म्हणजे २८० कोटी काम करणारे हात आहेत, भारतीय बुद्धिमत्तेच्या जोरावरच अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली, किंवा इंग्लंड, युरोप, कॅनडा पुढे गेले आहेत. किमान १० तास सूर्यप्रकाश, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, वसंत, शिशिर असे चार पाच ऋतू, शेकडो नद्या, लांबच लांब समुद्रकिनारे, उपजावू जमीन, हिरवीगार धान्याची शेतं, घनदाट जंगलं, समृद्ध खनीज साठे आणि उत्तुंग हिमालयासारखे पर्वत एकीकडे वाळवंट तर, दुसरीकडे सिमला काश्मीरचा बर्फ निसर्गानं सगळं म्हणजे अगदी सगळं भरभरून आणि मुक्तहस्ते दिलंय.

तरीही वरील सगळ्या देशांपेक्षा आपण गरीब आणि मागास का आहोत???

**सामाजिक, आर्थिक, मानवी विकास निर्देशांकापासून हॅपिनेस रिपोर्ट पर्यंत सगळीकडे आपण वरील देशांपेक्षा खुप खुप लांब, म्हणजे मागास का आहोत???**

दोष निसर्गात नाही सामाजिक संसर्गात आणि योग्य नेतृत्वाच्या अभावात आहे !

वरील सगळे देश धार्मिक सहिष्णुता मानताते धर्म ही व्यक्तिगत गोष्ट मानतात, राजकारणाशी त्याचा काहीही संबंध नाही, हे तिथं सतत बिंबवलं जातं विविधतेत एकता - सामाजिक सलोखा मानून प्रगतीशील मार्गांवर चालण्याला ते देश प्राधान्य देतात.

महत्त्वाचं म्हणजे, या सगळ्या देशांमध्ये भ्रष्टाचाराविरोधात कठोर कायदे आहेत आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते !

आजही वरील सगळ्या देशांमध्ये न्यूज़ चॅनल्स सरकारला शिक्षण-रोजगार-उद्योग अशा विकासांच्या विविध मुद्द्यांवर जाब विचारतात. कायदा आणि सुव्यवस्था काटेकोरपणे राबावी म्हणून प्रशासनावर दबाव असतो. माणसामाणसात जात, धर्म किंवा रंगावरून उच्चनिच ठरवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाते.

**तर आपल्याकडं टीव्हीवर टिपू सुलतान वरून घमासान सुरू आहे' मात्र ट्रेड डीलवर दातखीळ बसली आहे दिल्ली विद्यापीठात एका विद्यार्थिनीनं 'ब्राह्मण्यवाद झिंदाबाद' अशा घोषणा दिल्या आणि एक नट म्हणतोय, ''घरातले बाथरूम तुंबले तर हिंदू प्लंबरच बोलवा !''**

हिमू-मंम-भापा या महामृत्युंजय मंत्राच्या आधारे राज्याकर्त्यांनी ह्या देशाचा सत्यानाश करून ठेवला आहे. तुम्ही म्हणाल हा कुठला नवा महामृत्युंजय मंत्र? यापूर्वी कधी ऐकला नाही; मग, हा नवीनच कधी कुणी शोधला? थांबा सांगतो विश्लेषण करून...

**हि मू म्हणजे हिंदू-मुसलमान**
**मं म म्हणजे मंदिर-मस्जिद**
**भा पा म्हणजे भारत-पाकिस्तान**

या हिमू मंम भापा मधील सहा अक्षरी शब्दापेक्षा सातवा शब्द सत्ताधाऱ्यांकडे नाही आणि गेल्या बारा वर्षांमध्ये किंबहुना स्वातंत्र्य मिळाल्या नंतर या सहा शब्दांमध्येच सर्व लोकांना गुंतवून ठेवल्या गेलेले आहे.

जोडीला भारताचा जर कशाने सत्यानाश झाला असेल तर, भाटांनी आणि भटांनी देशांमध्ये जातीव्यवस्था तयार करून देशवासीयांना सहा हजारापेक्षा जास्त भागांमध्ये विभागून टाकले.

मुळात जात काय आहे तर, जात म्हणजे तुम्ही करत असलेल्या धंद्याची, व्यवसायाची किंवा कामाची विभागणी.

मातीचा कण आणि बी वापरून शेती करतो म्हणून कणबी, त्याचा अपभ्रंश म्हणजे कुणबी आणि मग त्या कुणब्यांमध्ये तिरळे कुणबी, बावणे कुणबी, धनोजे कुणबी, खैरे कुणबी, खिळोले कुणबी, खानदेश मधील दखणे कुणबी, लोणारे कुणबी, वांढेकर कुणबी, जाधव कुणबी, लेवा कुणबी, झाडे कुणबी, घाटावर राहतो म्हणून घाटोळे कुणबी, मूळ गाव सोडून दुसऱ्या गावाला शेती घेतल्यामुळे गढीचे स्वामींत्व गमावलेला म्हणजे अस्वामी, त्याचा पुढे अपभ्रंश म्हणजे असामी कुणबी, कुणबी पाटील, कुणबी देशमुख, गावाचे वतन मिळाले म्हणून वतनदार कुणबी, कोकणी कुणबी, आणि उर्वरित भारतभर कुर्मी आणि त्यांच्याही पोट जाती, असे कुणब्यांच्या, कुर्मिंच्या डझनावरी जाती किंवा पोटजातीत कुणबी, कुर्मी विभागून टाकला.

**मूळ कुणबी म्हणजे शेतकरीच; मात्र, तो ओलिताची शेती करत असेल तर त्याला केले माळी आणि मग त्यांच्यामध्ये अजून फूट पाडण्यासाठी, हळद पिकवतो म्हणून हळद्या माळी, कांदे पिकवतो म्हणून कांदे माळी, फुलाची शेती करतो म्हणून फुल माळी, जिरे पिकवतो म्हणून जिरे माळी, पानाची शेती करतो म्हणून पानमाळी, क्षत्रिय माळी, वनमाळी, डांगमाळी, गासेमाळी, काशी माळी, काचमाळी, कोसरे माळी, मरार माळी, पहाड माळी, लोणार माळी, पंचकळसी, आगारी माळी, लिंगायत माळी आदि पोट जाती व शाखांमध्ये विभागून टाकला.**

एखाद्या शेतकऱ्यांने म्हणजे, कुणब्यांनी शेतामध्ये तेलवान लावले मात्र त्याला भाव नाही म्हणून जर त्यांनी तेल घाणी लावली तर त्याला करून टाकले तेली. मग त्यामधे फूट पाडण्यासाठी एका बैलांनी घाणी चालवतो म्हणून एक बैल्या तेली, दोन बैलांनी चालवतो म्हणून दोन बैल्या तेली, तिळाचे तेल काढतो म्हणून तीळ तेली, सावजी तेली, एकलारी तेली, लाड तेली असे प्रत्येक राज्यात डझनावारी पोटभाग.

मुळामध्ये अशा प्रकारे व्यवसायावर आधारित सुतार, लोहार, रंगारी, ढोर, चांभार, कुंभार, सोनार, वाडी, बारी, कोळी, आंग्री, धनगर, धनगड, गवळी, बारा बलुतेदार अशा हजारो जाती आणि पोटजाती.

खरे तर, अनेक व्यवसायातील अनेक माणसं स्वतः

# फुकटखाऊ राजकारणाचा अंत झालाच पाहिजे, नाही तर...?

...पृष्ठ क्र. १३ वरुन

ला त्या जाती आणि मग त्यांच्या पोटजातीतील समजतात. राज्य निहाय त्यात पुन्हा बदल आहेतच.

अशाप्रकारे योजनापूर्वक भारतातील नागरिकांना सहा हजार भागांमध्ये भटांनी आणि भाटांनी विभागून टाकले आणि लोक सुद्धा त्याला कवटाळून बसले.

खरे तर, आजच्या काळात या कुठल्याही जाती व्यवस्थेचा काहीही अर्थ नाही. त्यातील बहुतांश उद्योग, कामे तर बंद झालेले आहेत किंवा स्वतःला त्या जातीतील समजणारी माणस तो उद्योग कित्येक पिढ्यांपासून करत नाहीत.

त्या जाती-जमातींमधील कित्येक मुले आज शिक्षण घेऊन उच्चपदांवर आहेत तरी त्यांची जात सुटत नाही. 'खालच्या' समजल्या गेलेल्या जातींतील आणि 'उच्चभ्रू' समजल्या गेलेल्या जातींतील मुला-मुलींचे आपापसात विवाह होताहेत, तरी स्वतःला ते त्या जातीचेच समजून घेतात, किंवा त्या मानसिकते मधून बाहेर यायलाच तयार नाहीत.

**काय हा देश नेहमी असाच होता?**

इतिहासाचा धांडोळा घेतला असता आपल्याला दिसेल की आपला देश हा खरोखर सोने की चिडिया होता आणि त्याचमुळे जगभरातील लुटारू ज्यात शक, हूण, मोगल, इंग्रज भारत लुटायला आले आणि लुटून गेले. भारताने मात्र कुण्या देशावर स्वारी केल्याचा इतिहास नाही.

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर या देशांमध्ये जश्या अनेक चांगल्या गोष्टी राबविल्या गेल्यात तश्याच काही चुकीच्या गोष्टी सुद्धा झाल्यात. मात्र, त्या काळामध्ये भारत हळूहळू का होईना प्रगती करायला लागला होता. विशेषत: २०१० पर्यंत तरी प्रगतीची पदचिन्ह दिसायला लागली होती, मात्र त्यानंतर विशेषतः २०१४ नंतर देशांमध्ये राबविल्या गेलेल्या अनेक गोष्टींमुळे देश झपाट्याने रसातळाला जायला लागला आहे.

भारताच्या राजकारणात फुकटखाऊ योजनेचा जो उच्छाद सध्या चालू आहे, तो केवळ निवडणुकीचा भाग नाही-तो देश उध्वस्त करण्याचा सरकारी ब्लूप्रिंट आहे.

**८० कोटी लोकांना मोफत राशन, मोफत वीज, मोफत भत्ता, मोफत दान, मोफत सुविधा, मोफत औषधोपचार, मोफत तीर्थयात्रा, मोफत बस प्रवास, लाडकी बहीण अश्या डझनावारी योजनांचा जो तमाशा लावला गेलाय, तो लोककल्याणाचा नाही तर, ती मतांची होणारी लिलावबाजी आहे.**

आता नव्या नोटा म्हणजे मोफत योजना आणि ही नवीन चलननीती आणि राजनीती आहे.

हा देश स्वतःच्या पायावर उभा राहण्याकरिता संघर्ष करतोय, पण प्रत्येक निवडणूक हीच देशाला मागे ओढणारी नवी साखळी बनतेय.

या मोफत उधळपट्टीमुळे सरकारांनी आपल्या तिजोरीत एकापेक्षा एक मोठे खड्डे करून ठेवले आहेत. हे खड्डे भविष्यात भरून निघणार नाहीत. हे खड्डे म्हणजे आर्थिक कबर आहेत.

अजून स्पष्ट सांगायचं तर निवडणूक जिंकण्यासाठी राजकारणी या देशाला अर्थव्यवस्थेच्या शवपेटीत गाडत आहेत. बेरोजगारी एवढी भयानक पातळीवर आहे की, युवा वर्गाच्या डोळ्यात आज स्वप्न नाही केवळ एक फॉर्म आणि त्यावर फुकट काही मिळेल का याची वाट.

हा युवा भारत आहे की सरकारी अनुदानाचा ''ग्राहक''?

आपण स्वावलंबी पिढी घडवतो आहोत की फुकटाकडे बघणारी भिक्षेकरी मानसिकता?

**ज्या देशात २८० हातांकरिता रोजगार निर्माण करायला हवाय, तो देश अनुदान म्हणजे भिकारी निर्माण करतो आहे आणि युवकांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना व्यसनाधीन करतो आहे.**

ज्या देशात उद्योग आणायला हवेत, तो देश फुकट योजना लावत बसलाय.

ज्या देशात उत्पादन वाढवायला हव, तो देश मतांसाठी खालच्या पातळीवर उतरून ''नोट के बदले वोट करत बसलाय.

अर्थव्यवस्था ही चालते कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या, करदात्यांच्या, उद्योजगांच्या रक्तातून, बुद्धिमत्तेतुन आणि घामातून.

पण भारताला आता हे ज्ञान विसरायला लावले जात आहे. त्याऐवजी दिली जातेय ''मोफत'' नावाची एक अत्यंत धोकादायक नशा.

ही नशा लोकांना काम करण्यापासून दूर नेते.

ही नशा लोकांच्या पाठीवर कर्जाची पोती बांधून देते.

ही नशा उद्योगांना भारताबाहेर पळायला भाग पाडते.

ही नशा ग्रामीण भागाला कायमच्या अंधारात ठेवते.

आणि ही नशा देशाची अर्थव्यवस्था ''लाईफ-सपोर्टवर ठेवलेले रुग्ण'' बनवते.

ग्रामीण भारत सर्वाधिक जळतो आहे. शेतमालाला भाव नाहीत, रस्ता नाही, आरोग्य केंद्र नाही, शाळा नाही, मग या ग्रामीण भागात थांबेल कोण? आणि कशाकरिता?

एकट्या महाराष्ट्रात आज जवळपास ४५०० गावे ओसाड पडली आहेत आणि त्यातील जवळपास ४००० गावे एकट्या विदर्भातली आहेत. देशात लाखो गावे आज ओसाड पडली आहेत.

शेतकऱ्यांच्या मुलाला ना कोणी मुलगी देत ना नोकरी. हजारो नव्हे अगदी लाखो, करोडो तरुण आणि तरुणी आज लग्नाची वाट पाहत आहेत.

निवडणूक आली की, अनुदानाचा आणि योजनांचा धबधबा. हा धबधबा विकासाचा नाही-तो फसवणूक करण्याचा सोयीचा पाऊस आहे.

पाऊस थांबला की जमीन कोरडी. मोफत योजना थांबली की घरात उपासमार.

असा विकास म्हणजे फसवणुकीचा फार्स आहे.

EVM असो, निवडणूक आयोग असो, पोलीस यंत्रणा असो नाहीतर सीबीआय, इडी असो वा न्यायसंस्था असोत-

या देशाच्या लोकशाहीचा प्रत्येक आधारस्तंभ संशयाच्या भोवऱ्यात आहे.

लोकशाहीच्या देवळात ठेवलेल्या विश्वासाला आता तडा जातोय.

म्हणूनच फुकटखाऊ राजकारण पुढचे पाऊल उचलू शकते.

विश्वास आणि सन्मान मोडला की, जनता विकत घेणे सोपे होते, आणि हे सगळं करताना मत मिळाले की राजकारण्यांच्या गाड्या पुढे जातात; धिटाईने, बेमुर्वतखोरपणे, निर्लज्जपणे वागतात आणि त्यांचे पाहून मग नोकरशाहीला तर माजच चढतो.

देश आर्थिक अंधारात गडप झाला तरी त्यांना फरक पडत नाही.

फरक पडायला हवा जनतेला.

पण जनता जशी अनुदानाच्या व्यसनात अडकते, तसा प्रश्न विचारण्याचा त्यांचा स्वभाव मरतो.

''काम नाही, पण मोफत मिळतंय ना!'' या एका वाक्यातूनच देशाचा विनाश सुरू होतो.

फुकटखाऊ जनता आणि विश्वास गमावलेली संशयास्पद निवडणूक पद्धती यामुळे भारत अतिशय मोठ्या आर्थिक भूकंपाच्या उंबरठ्यावर आहे.

विकासापेक्षा मोफतपणाला महत्त्व देणारा देश टिकत नाही, तो हळूहळू आतून कोसळतो.

**एक धक्का पुरेल आणि तो धक्का म्हणजे नुकताच अमेरिकेने आमच्यावर लादलेला ट्रेड डील. आता लवकर एक दोन वर्षातच उरेल फक्त कर्जात बुडालेला, फुकटात जगणारा, आणि अंधःकारमय भविष्य असलेला व्यसनी आणि विकलांग देश.**

जर हा देश वाचायचा असेल तर, फुकटखाऊ राजकारणाचा अंत आणि नवीन सक्षम नेतृत्वाचा उदय झालाच पाहिजे, अन्यथा भारताचा अंत ठरलेला आहे, फक्त तारीख बाकी आहे.

***प्रकाश पोहरे***

संपादक, दैनिक देशोन्नती, दैनिक राष्ट्रप्रकाश, साप्ताहिक कृषकोन्नती

---

## गोविंद गिरी महाराजाचा भोंदूपणा

...पृष्ठ क्र. १२ वरुन

करणे आवश्यक आहे. ही समीक्षा व्यक्तीविरोधी नसून विचारविरोधी असते. समाजाला चुकीची माहिती दिली जात असेल तर, ती दुरुस्त करणे हे बौद्धिक जबाबदारीचे काम आहे. महाराष्ट्राची संतपरंपरा ही कोणत्याही एका विचारसरणीची मालमत्ता नाही; ती संपूर्ण समाजाची सामूहिक सांस्कृतिक संपत्ती आहे.

अखेरीस प्रश्न असा उरतो की, आज आपण संतपरंपरेतून काय शिकणार आहोत? जर आपण केवळ त्यांच्या नावावरून वाद घालणार असू तर त्या परंपरेचा उपयोग नाही. परंतु, जर आपण त्यांच्या विचारांतील समता, विवेक, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचा स्वीकार करणार असू; तर, ती परंपरा आजही जिवंत राहील. संतांचा खरा सन्मान त्यांच्या नावाचा जयघोष करून होत नाही; तर, तो त्यांच्या मूल्यांचे आचरण करूनच होतो. म्हणूनच संत तुकारामांनी दिलेला संदेश आजही मार्गदर्शक ठरतो- ''बहु दुधाळ जरी झाली गाई म्हैस तरीच काय होईल कामधेनु; तुका म्हणे अंगे व्हावे ते आपण तरीच महिमा येईल कळू.'' म्हणजेच संतांचे महत्त्व समजून घ्यायचे असेल तर, त्यांच्या गुणांचा स्वीकार स्वतःच्या जीवनात करावा लागतो. जे लोक सत्तेच्या जवळ राहून संतांची व्याख्या बदलण्याचा प्रयत्न करतात, त्यांना हा संदेश समजणे कठीण आहे. म्हणूनच समाजाने सजग राहून संतपरंपरेचा इतिहास आणि विचार यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. तेव्हाच संतांच्या नावावर चालणाऱ्या अज्ञान, दांभिकता आणि राजकीय स्वार्थाला योग्य उत्तर देता येईल.

(लेखक वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत.)

# श्याम मानव यांचे भोंदूगिरी विषयीचे विचार व कार्य

मी तुझा कृष्ण, तू माझी राधा' हा सर्वच काळातील सर्वच बाबाबुवांच्या लैंगिक शोषणाचा यशस्वी पासवर्ड आहे. हा पासवर्ड सर्वच स्तरातील, विशेषत: श्रीमंत, उच्चभ्रू, मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांना लागू होतो, असा आजवरचा इतिहास आहे. म्हणूनच आचार्य अत्रे यांनी 'बुवा तेथे बाया' असे म्हणून ठेवले आहे.

**आज डिजिटल प्रसारमाध्यम आणि सोशलमिडिया आहे. सीसीटीव्ही सारखे तंत्रज्ञान आहे. पण हे सगळे नसताना, केवळ वर्तमानपत्रांच्या आधारे विदर्भातील अशा बाबा महाराजांचा भंडाफोड प्रा. श्याम मानव यांनी ऐंशी-नव्वदीच्या दशकात विदर्भात केला होता. तेंव्हा वर्तमानपत्रांचा आधार मिळविणे सोपे नव्हते. मोठे संपादक आणि पत्रकारही व्यक्तिगत आयुष्यात बाबा-बुवांचे भक्त असत. ह्याचे कारण विद्यापीठांचे कुलगुरू, शहरातील डॉक्टर, वकील आणि मोठे व्यापारी यांच्या घरी त्या बाबा-महाराजांची गादी असे. मनोरुग्ण बाबाच्या तोंडातील उष्टे अन्न हे लोक खात. त्यांच्या घरातील बायका अशा बुवांची अंघोळ घालत. श्याम मानव यांनी शुकदास महाराज, गुलाबबाबा, अलाहाबादजवळील म नगडचा 'कृपालू' महाराज, प्रियाशरण महाराज यांची प्रकरणे चव्हाट्यावर आणली आणि मोठा स्फोट झाला. या सगळ्या प्रकरणांची सचित्र कहाणी श्याम मानव यांच्या 'बुवाबाजी : बळी स्त्रियांचा' (मनोविकास प्रकाशन, १९९१) या पुस्तकात आहेत.**

किर्लोस्करांचे साप्ताहिक मनोहर, बाबा दळवी (लोकमत) आणि मामासाहेब घुमरे (तरुण भारत) या संपादकांचा आधार असल्याने श्याम मानव यांनी ही प्रकरणे चव्हाट्यावर आणली.

१९८५ दरम्यानची गोष्ट. नागपुरातील अमरावती मार्गावरील हाय फाय सोसायटीत राहणाऱ्या अतिशय उच्चभ्रू कुटुंबातील दोन उच्चशिक्षित मुली एका बाबासोबत पळाल्या. या प्रकरणामागे मनगडच्या कृपालू महाराजांचा हात होता. त्याचा एक भक्त नित्यानंद हा नागपूरचाच एक युवक होता. त्याने एका अल्पवयीन मुलीवर कृपालूने बलात्कार केल्याचे प्रत्यक्ष डोळ्याने बघितले आणि बोंबाबोंब झाली. याचवेळी विदर्भात आपल्या लैंगिक चाळ्यांचा प्रसार करण्यासाठी कृपालू बाबाने मनगडहून प्रियाशरण महाराजाला नागपूरला पाठवले. नेहमीप्रमाणे अध्यात्माची गोडी असलेली काही श्रीमंत कुटुंबे प्रियाशरणच्या जाळ्यात फसली. लहानपणापासून 'देवदेव' करणाऱ्या सुसंस्कृत घरातील उच्चशिक्षित मुलीही प्रियाशरणच्या सेवेत मग्न झाल्या. मी पूर्वजन्मीचा कृष्ण तू राधा, रुक्मिणी हे डायलॉग म्हणणाऱ्या कृपालूचा बलात्कार बघणाऱ्या 'नित्यानंदनेच' आपल्यावर बलात्कार केला असे भर पत्रकार परिषदेत त्या मुलींकडून खोटेच वदवून घेण्यात प्रियाशरण यशस्वी झाला. मुली बिचाऱ्या नाहक बळी गेल्या. त्यांना मनगडला पळवून नेण्यात आलं. प्रकरण अखेर नागपूरच्या अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे आलं. त्या मुलींनी सत्य परिस्थिती पोलीस आणि समितीसम ोर आणली. श्री. हरिश देशमुख, उमेश चौबे यांच्या प्रयत्नाने अखेर कृपालू बाबांना विमानतळावर उतरताच भल्या पहाटे नागपूरमध्ये अटक झाली. पण तो लगेच जमानतीवर सुटला. (ही आपल्या देशाची परंपरा) स्वामी प्रेम परमहंस हा अमेरिकेतील



एक भारतीय गुरू. कॅलिफोर्निया येथे ८ वर्षाच्या बालिकेशी १७ महिने लैंगिक चाळे केल्याबद्दल तेथील न्यायालयाने परमहंसाला ६४ वर्षांची शिक्षा ठोठावली होती. आपल्याकडे राजकारणीच अशा बाबांना डोक्यावर घेतात व भक्तांची संख्या वाढत जाते.


चमत्कार आणि अध्यात्म यांचे इतके सख्य आहे की समाजातील मोठमोठी माणसे यातून सुटू शकत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे व्यंकटनाथ महाराज. मुंबईपासून नागपूरपर्यंत त्यांचे शेकडो भक्त. त्यांना स्त्रिया न्हाऊ घालत. त्यांच्या पायाचे तीर्थ भक्त प्राशन करत. त्यांचा उष्टा विडा खायला तर स्त्रिया झुंबड करत. या व्यंकटनाथांच्या चमत्कारांचे संकलन प्राचार्य गो. मो. कोलते यांनी 'जीवनदर्शन' नावाच्या ४६० पानांच्या पोथीत केले आहे. या अरेबियन नाईट्सलाही लाजविणाऱ्या चमत्कारांच्या भाकडकथांना डॉ. श्री. भा. वर्णेकर (प्रज्ञाभारती), ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. मधुकर आष्टीकर, प्राचार्य राम शेवाळकर यांनी प्रस्तावना लिहिल्या आहेत. श्याम मानव यांनी व्यंकटनाथांना या चमत्काराबद्दल विचारले असता त्यांनी कानावर हात ठेवले. पण भक्तांना ते तसे कधी सांगत नसत. या लबाडीमुळेच १९८४ मध्ये झालेल्या व्यंकटनाथांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्याला राम शेवाळकरांनी उपस्थित राहण्याला नकार दिला. पण बाळासाहेब भारदे आणि मधुकर आष्टीकर यांनी व्यंकटनाथांच्या चमत्काराचे कौतुक करून आपली 'श्रद्धा' जाहीर केली होती.

**विदर्भातील आणखी एक जबर बाबा म्हणजे 'गुलाबबाबा.' अमरावती जिल्ह्यातील काटेल कोलद येथील गुलाबबाबा हे फार पेट्रोलची गाडी चालवणे, विजेशिवाय मोठं प्रस्थं आहे. नागपुरातही मठ होता. बिना तेलाने झाडावर दिवे लावणे आणि कृष्ण बनून स्त्रियांशी रासक्रीडा करणे हे गुलाबबाबाचे चमत्कार, शंकरराव चव्हाण सारखे मंत्री, अधिकारी, चंबळच्या खोऱ्यातील डाकू आणि विद्यापीठातील प्रोफेसर या बाबाचे भक्त आहेत असा प्रचार केला जातो. १९८९ मध्ये अंनिसच्या अमरावती कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील गुलाबबाबा विरोधात जनजागरण सुरू केल्यामुळे हा बाला हाताशी धरून त्याने कार्यकर्त्यांनी धमकावणे चवताळला. त्याने शिवसेनेच्या काही लोकांना हाताशी धरून कार्यकर्त्यांना धमकावणे सुरू केले. या बाबाची अनेक कृष्णकृत्ये असलेले आपले पुढारी आणि अधिकारी माहित असूनही त्याच्याविरोधात काहीच करीत नव्हते.**

राजकारणी आणि शासकीय अधिकारी बाबांच्या पाठीशी असल्याने बुवाबाजी सुरू असते. प्रत्येक बाबाच्या मठात त्याच्या कायमच्या सेवेत असलेल्या भक्त बायकाच अधिक असतात. विज्ञानाची पदवी किंवा पद्व्युत्तर शिक्षण घेतलेल्या या स्त्रियांना 'मूल कसे होते' हे माहीत नसते असे नव्हे तर, चमत्काराने भरलेल्या पोथ्यांचे संस्कार लहानपणापासून त्यांच्यावर झालेले असतात. शिवाय चित्रपट-कादंबऱ्यातून मोकळेपणाने दाखविलेला शृंगार प्रत्यक्षात कधीच वाट्याला न येणाऱ्या प्रौढ कुमारिकांना मठातील श्रद्धापूर्ण वातावरणात चांगलीच सुरक्षितता लाभते. त्यामुळे बाबांना बळी पडणाऱ्या महिलांची संख्या अधिक आहे. अशा बुवांचे भक्त नेते, अधिकारी, पत्रकार यांच्यापासून ते सामान्यांपर्यंत असल्यामुळे त्यांच्या मठांमधील पापे क्वचितच चव्हाट्यावर येतात. आपल्या समाजातील विशिष्ट मानसिकतेमुळे हजारो प्राचीन देवदेवता उपलब्ध असूनही किळसवाण्या महाराजांच्या चमत्कारिक लीलांकडे लोक आकर्षित होतात. भ्रष्टाचार लपवण्याची मानसिकता, दबलेल्या लैंगिक भावना, पुत्रप्राप्ती न झाल्यामुळे होणारा नवविवाहितांचा सासुरवास ही मुख्य कारणे यामागे आहेत. पण बुवाबाजीमुळे प्रचंड प्रमाणात आर्थिक लैंगिक शोषण होत असतानाच सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचे अड्डे या मठांमध्ये स्थापन होतात.

या प्रकाराला आळा बसावा म्हणून दि. २० मे १९८५ रोजी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. याकरिता डॉ. चंद्रशेखर पांडे, डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, श्याम मानव, हरिश देशमुख, प्रा. सुधाकर जोशी, डॉ. रूपा कुळकर्णी, डॉ. उषा गडकरी, सुरेश अग्रवाल, नागेश चौधरी यांनी पुढाकार घेतला. या समितीच्या माध्यमातून शेकडो बुवा-देवींना अक्षरशः पिटाळून लावण्यात आले. विदर्भाच्या तरुणांमध्ये बुद्धिप्रामाण्यवादी चैतन्य निर्माण करण्याचे कार्य या समितीने केले. बहुतेक बुवा हस्तस्पर्शाने किंवा मंत्राने रोगनिवारण करण्याचा दावा करतात याच.. गोष्टीचा आधार घेऊन या बाबांची लबाडी बाहेर काढता येते. भा.दं. वि. ४२० आणि' ड्रग्ज अ‍ॅन्ड मॅजिक रेमिडीज अ‍ॅक्ट १९५४-तसेच, मेडिकल प्रॅक्टिशनर्स या कलमाद्वारे अं.नि. समितीने आजपर्यंत मोठ्या मोठ्या बाबांना अटक करविली आहे. याच कायद्याअंतर्गत ऑगस्ट ते सप्टेंबर १९९२ या काळात तब्बल १५ बुवांचा भंडाफोड करून त्यांना अटक करविण्यात समिति यशस्वी झाली झाली. यातीलच एक बाबा म्हणजे नागपूरच्या हॉटेल राधिकाच्या रूम नं. १० मध्ये हर्षद मेहता प्रमाणे शेअर्सच्या व्यवसायात पैसा मिळवून देणारे ताईत देणारा पं. विष्णू शर्मा नागपूरच्या जुगाऱ्यांना लाखोंनी गंडविणारा हा बाबा अखेर गजाआड झाला.

या सर्व बाबांना आव्हान देऊन त्यांना अटक करताना एक गमतीचा प्रश्न मनात येतो की, जे सूक्ष्म देहाने हिमालयावर जातात, भूत भविष्याचे अंतज्ञान ज्यांना असते, चमत्काराने जे अंगठी ताईत निर्माण करतात त्यांची शक्ती पोलिसांच्या हातकड्यांसमोरच का नष्ट होते?



अत्यंत गरीब अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील डॉ.संपदा मुंडे ही मुलगी आपल्या आई वडिलांचा आधार होण्याची वेळ येताच, ह्या दळभद्री व्यवस्थेने तिचा बळी घेतला. त्यावेळी तिला न्याय देण्याऐवजी ह्या चाकणकर बाईने स्वतःच्या राजकीय बकासुरी भुकेसाठी, कोणालातरी खूष करण्यासाठी तिच्या चरित्र्यावर शिंतोडे उडवले. तिच्या अब्रूची लक्तरे वेशिवर टांगली. त्या संपदा ताईचा ह्या चाकणकर बाईला तळतळाट लागलाय. रक्ताचं पाणी आणि हाडाची काडं करून मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या लेकराच्या वृद्ध मायबापाची हाय लागलीय.


***चाकणकर बाई तुम्ही किडे पडून मराल.***



गुवाहाटीत गेलेले आणि कापलेले रेडे, अमावस्या,पौर्णिमेला होणाऱ्या अघोरी पूजा, वर्षावर झालेल्या पूजा, शिंदे (सपत्नीक) -विखे-सतत ग्लानीत वाटणारे केसरकर यांनी खरातसोबत केलेली पूजा, चाकणकर ताईंनी खरातचे पाय धुणे, वाढदिवसाचे केक भरवणे, व्हीएस आर कंपनीच्या पायलटचा खरातसोबतचा फोटो आणि दादाचा घातपाती मृत्यू झाल्याची शक्यता यांचा घट्ट संबंध आहे. याचा तपास कसा होईल? ज्या माणसाकडे गृहमंत्रीपद आहे त्याची काय इच्छा आहे? सुनेत्रा पवारांकडून काय अपेक्षा ठेवणार? त्या स्वतःच एकतर अडचणीमुळे किंवा ब्लॅकमेलमुळे तोंडावर चिकटपट्टी लावून बसल्या आहेत. रोहित पवार यांचे प्रयत्न पुरे पडणार नाहीत.पवार साहेब बोलत नाहीत.सुप्रिया सुळेंचा अस्तित्वाचा लढा चालू आहे. अशा परिस्थितीत न्यायाची अपेक्षा कोणाकडून ठेवायची?

***प्रा. दीपक पवार***




## काल म्हणे कंपनीत स्फोट झाला

काल म्हणे कंपनीत स्फोट झाला
बघता बघता साऱ्याचा इस्कोट झाला
आगीने धुराचे लोळ उठले उंचावर
हतबल कामगार झाले अनावर
पळाले त्यांचा जीव वाचला
इतरांवर काळाने घाव घातला
रसायने पेटली, मशीन्स फुटली, आगीचे उसळले डोंब
मदत येईपर्यंत उघडी पडली, सुरक्षेची बोंबाबोंब
जखमी झालेल्यांना दाखल केले
उरलेले आत अडकून पडले
जळून गेली कंपनी जिथे
निष्पाप कसे वाचणार तिथे?
नातलगांचा आक्रोश किती तो होता!
लेक ओळखायला चेहरा कुठे शिल्लक होता?
ऐन दिवाळीच्या आधी घरे सुनी सुनी झाली
त्या दुःखाची भरपाई काही लाखांनी केली
पेटलेली कंपनी थंड होईल
तुमच्या आमच्या सारखीच
ऑडिट, सुरक्षा वाऱ्यावर जाईल
पुन्हा आधीच्या सारखीच
स्फोटांची मालिका कधी संपेल
कुणाला सांगणे जमत नाही
गावात आमच्या एमआयडीसी आहे
भय इथले संपत नाही

**...ओंकार झांजे**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०